नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ुगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

संपादक

वा. ना. देशपांडे

१९४८

किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

यु ग वा णी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर
अमरावती (वऱ्हाड

जून १९४८

अनुक्रमणिका

१ वाट (कविता)—पां. श्रा. गोरे
२ स्वागताची तयारी (कविता)—त्र्यं. ब. पुराणिक, एम्. ए.
३ कोण आवरते तई मज कळेना! (कविता)—सौ. वसुंधरा धुमाळे
४ दोन चुटके (कविता)—वा. दे. धुमाळे, बी. ए.
५ औदार्य (कविता)—भा. आ. पांढरीपांडे
६ कवि अनिल—द. चिं. सोमण
७ दोन ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरा—रा. स. वाकसकर
८ मराठी नाटकांतील विनोद-विलास—मो. द. ब्रह्मे, एम्. ए., एल्. एल्. बी.
९ दोन मित्र—मधु जुननकर
१० जातीचे छंद—वि. ज. सहस्रबुद्धे
११ साहित्यसमालोचन
१२ संपादकीय

पुढील अंकीं बिहारचे गव्हर्नर ना. माधवरावजी अणे यांचा महात्माजींवर लेख



अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघ नागपूर
ग्रंथालय
दुर्मिळ ग्रंथ संग्रह

वाट

खुळखुळति घुंगरू चाल चालते जोडी
थबकली ग दारीं सखे! कुणाची गाडी!
दुडदुडाहि धावत गुलाम तिकडे गेला
हा कालपासुनी लवतो डावा डोळा!
वाजले काय ते टाळ। भणू भण
घे बाई! कानिं चहाळ। जाउन
ये कसा न अजुनी बाळ। परतुन!
गुंतला ग ज्याच्या जिवांत सारा प्राण
कधि पाहिन येतां साजण गावाहून? १

मोडला ग जाउन त्यास आज आठवडा
हीं सुकलीं पानें उघड पहा पानपुडा!
हा भरला रांजण सखे! सुनी अंगधुणी
कोरडा ग गोटा टांकुं कुणाला पाणी?
कामास न लागे हात। का बरें?
तोंडचा घास तोंडांत। हा फिरे!
काढतां पलंगीं रात। मन. झुरे
गरगरा फिरे वर घार जशी चौफेर
तशि सख्यास धुंडे एकतार ही नजर! २

मनमोहन नेम न येईल अर्ध्या रातीं
उजळते जागुनी डोळ्यांच्या या ज्योती!
मांडीन पाट मी हातिं उगाळुनि गंध
जेवतां ग पाहिन कधि माझा गोविंद?
कारकीर वाजे जोडा। अंगणीं
का दणाणला गे वाडा। साजणी?
आले का?-उघड कवाडा-। घरधनी?

मन अधीर बाई! जिवांत नाही जीव!
कधि भाव जाणुनी उतरणार घरिं देव! ३

पां. श्रा. गोरे

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वागताची तयारी

त्र्यं. ब. पुराणिक एम्. ए.

करूं या चला स्वागताची तयारी
फुटे तांबडे भू शुचिर्भूत झाली

तमिस्त्रा पळाली निशाही निमाली
नभःप्रांगणींचीं खपुष्पें गळालीं
उषा पूर्वदेशीं नवा रंग ल्याली
खगांनो ! करा गायनाची तयारी १

अहो ! कालपर्यंत राणीव होती
तमाची चहूबाजुला आणि नेत्रीं
दिसेना; कळेना किती चाललो की
अता मार्ग दावील आम्हा तमारी २

झडूं लागले चौघडे मंदिरांत
जिथें देवराणा प्रकाशी प्रशांत
प्रभू सुस्वरें भक्त तो आळवीत
पुढें साह्य होईल आम्हा मुरारी ३

सडा आणि संभार्जनें अंगणांत
लतापल्लवें मंदिरें शोभिवंत
गवाक्षीं कुणी हार घ्या हो करांत
चला राजमार्गावरी आज सारीं ४

कुणी नौबती घ्या, कुणी बासरी घ्या
करामाजि कर्णे कुणाच्या असूं द्या
सतारी तसे दिल्रुबेही करीं घ्या ·
कवीची निजे शांत ती घ्या तुतारी ५

निशेचे नको यापुढे नांव आता
निराशा न स्पर्शो कुणाच्याहि चित्ता
सुवर्णक्षणीं या अम्हां भाग्यवंतां
खरी सेवुं द्या स्वागताची खुमारी ६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११९४८
मून

कोण आवरते तई मज कळेना !

सौ. वसुंधरा धुमाळे

समय संध्येचा रम्य सौख्यकारी
कुणी बाळासह युवति उभी दारीं
उजळले सारे दीप पूर्णतेने
बाळ पाही ते किती कौतुकाने !

एक वर्षाचें जरी सान मूल
दीपकिरणांची पडे त्यास भूल
झेप टाकी तें तयां पकडण्यास
सावरे माता परी अवखळास !

मनीं येई : त्या तान्हुल्यासमान
रम्य दृश्यें मम हरति नई भान
बघें कवटाळूं स्तिमित मनें त्यांना
कोण आवरते तई मज कळेना !

●

दोन चुटके

वा. दे. धुमाळे

१ चोरी

अरसिक — हेमांगिनी ! यष्टि तुझी सुडोल
शुष्का कटी कां, उमजे न कोड !
नवकामिनी — हें मानवा ! गूढ तुला न ठावें !–
चोरून तेथून सुवर्ण नेलें !
ज्वानी भरे, स्थौल्य उरस्थळांत
शृंगार शोभे नवकामिनींत !

२ शोध

बालक — वृद्धे ! अशी वाकवुनी कटी गे
शोधार्थ का तूं वद चालशी गे !
वृद्धा — तारुण्य एकाकि हरूनि गेलें
लाभार्थ त्याच्या मम यत्न सारे !

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

औदार्य

भा. आ. पांढरीपांडे

गांवाच्या शिवेस
पडकें मंदिर
मूर्ति ती अजूनी
आतली सुंदर !१

मंदिराशेजारीं
जुनाट पिंपळ
देई तो अजूनी
सावली शीतळ !२

पिंपळाजवळी
मोडका चौथरा
उदार अजूनी
द्यायास तो थारा !३

चौथऱ्याकाठाशीं
विच्छिन्न विहीर
त्यांतलें अजुनी
जळ तें मधुर !४

विहीरीसमोरी
जीर्ण पडशाळा
भरते गुरांची
तेथ रोज शाळा !५

कालाने ध्वंसिलें
तेथील ऐश्वर्य
जींवंत अजूनी
मायाळू औदार्य !६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवि अनिल

द. चिं. सोमण

● प्रसिद्ध कवि आ. रा. देशपांडे ऊर्फ अनिल यांचा सुंदर परिचय त्यांचे मित्र सत्कवि सोमण यांनी या लेखांत करून दिलेला आहे.

★

कापरासारखें स्वच्छ चांदणें पडलें होतें. रात्रीं दोन वाजण्याचा सुमार, त्यांतून अप्पासाहेबांचा बंगला गावापासून अगदी दूर, त्यामुळे कमाल शांतता होती. बंगल्या-समोरील विस्तृत मोकळ्या जागेंत ते व मी आरामखुर्च्या टाकून बसलों होतों. अप्पासाहेब तन्मयतेने त्यांची 'चिरयौवन' कविता म्हणत होते—

फिरून वर्षचक्र हें पुढे पुढेच जातसे

इ. स. १९४४ च्या उत्तरार्धांत अप्पासाहेब वाशीमला सब्‌जज म्हणून आले व वर्ष दीड वर्षांतच इथून बदलून गेले. फिरत्या कालचक्राच्या, तद्वत्, चालू योगायोगांच्या कलाकलाने त्यांच्या सहवासाचा मी भरपूर लाभ घेतला आणि त्यांच्या स्वभावामुळे तें शक्यहि झालें. त्यांची माझी पहिली भेट आमच्या घरीं झाली. ते वाशीमला येऊन दोन आठवडे झाले होते. भग्नमूर्तिकारांना भेटायची इच्छा मला किती तरी दिवसांपासून होती; आणि ते वाशीमला आल्याचें कळलें, तेव्हा मला अर्थातच आनंद झाला. पण दोन आठवडे गेले, तरी माझ्या प्रकृतीमुळे मला स्वत: जाऊन त्यांना भेटतां येईना. अखेर एक दिवस वैतागून मीं त्यांना कोर्टातच चिठ्ठी पाठविली आणि कळवलें की, आपल्याला भेटायची उत्कट इच्छा आहे, तथापि मी अगतिक असल्याने मला आपल्याकडे येणें खरोखरच अशक्य आहे.

आणि, त्याच दिवशीं संध्याकाळीं हा आस्थापूर्ण स्वभावाचा प्रसिद्ध कवि आमच्या घरीं आला.

इतर ख्यातनाम कवींचा जो अनुभव दोन चार प्रसंगीं आलेला होता, त्याची आठवण अचानक होऊन अप्पासाहेबांच्या सौजन्याबद्दल मला आदर वाटला.

हळूहळू अप्पासाहेबांशीं ओळख वाढत गेली, वर्षचक्र पुढेपुढेच जात होतें. आणि त्यांच्या सुखद सहवासांतला हा वर्षदीड वर्षांचा काल केव्हाच निघून गेला.

मूर्तिमंत चैतन्य, उत्साह, उल्हास म्हणजे कवि अनिल! त्यांच्या त्या उत्साहामुळे त्यांच्याबरोबर फिरायला जाणें मला टाळावें लागे. कारण त्यांच्या चालींतली गती व माझा संथपणा यांचा मेळ घालणें मला अशक्य व्हायचें!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अप्पासाहेब साधें बोलायला लागले, तरी अशा कांही अदम्य उत्साहानें बोलतात की, त्यांच्या त्याहि कथनांत एक प्रकारचा गोडवा निर्माण व्हावा.

एक दिवस संध्याकाळीं मी त्यांना भेटलों असतां, त्या दिवशीं कोर्टातल्या कामानें ते किती थकून गेले होते, हें त्यांनी इतक्या उत्साहानें मला सांगितलें की, त्यांची ती मनोरचना पाहून मी चकितच झालों!

वाशीम येथील जैन मंदिरांतल्या मूर्ति पहायला आपासाहेबांच्या बरोबर मी एकदा गेलों होतों. त्या जुन्या, भव्य मूर्तींच्या सान्निध्यांत अप्पासाहेब देहभान विसरले होते, आपल्याच तंद्रींत होते ते! त्या दीड दोन तासांत अनिलांच्या जगांत मूर्तींशिवाय इतर कांही जणूं अस्तित्वांतच नव्हतें. अनिलांचें सारें अस्तित्व त्या शिल्पसौंदर्यांत विलीन व्हायचा आटोकाट प्रयत्न करीत होतें आणि त्यांचें मन त्यांच्या नकळत त्या प्रयत्नावरच एकाग्र झालेलें होतें. 'मनसः एकाग्रता समाधिः।' असें राजशेखर 'काव्यमीमांसें'त म्हणतो. राजशेखराला अभिप्रेत असलेला 'एकाग्रता' शब्दाचा विशिष्ट अर्थ आपल्याला आज कळला, असें मला त्या दिवशीं क्षणभर वाटलें.

मंदिरांतून परत येतांना मीं एकाला म्हटलें—'आज एका गृहस्थाशीं नवीन ओळख झाली माझी! ते गृहस्थ म्हणजे 'भग्नमूर्ति' कार आ. रा. देशपांडे!'

अप्पासाहेबांच्या इतकें जीवनावर प्रेम असलेला दुसरा गृहस्थ माझ्या पहाण्यांत नाही. आयुष्यांतला क्षण नि क्षण ते उत्साहानें जगण्याकडे खर्च करतात. त्यांचा जिज्ञासापूर्ण उत्साह पाहिला की—

Thou dost float and run,
Like an unbodied joy whose race is just begun.

ह्या शेलेच्या पंक्ति मला नेहमी आठवत. त्यांच्याकडे पाहिलें की वाटे, कसल्यातरी अनिर्बंध आनंदाचें तुफान त्यांच्या अंतःकरणांत सुटलेलें आहे आणि तो आनंद कुणाकुणाला व किती देऊं, असें त्यांना झालेलें आहे. एकदा माझे एक सन्मित्र त्यांना विनोदानें म्हणाले, 'अप्पासाहेब, खूप आनंदांत दिसतां आज; एखादा कल्पवृक्ष सापडला की काय?'

'अरे, कुणाला हवा आहे तो कल्पवृक्ष? प्रयत्नांत जो आनंद आहे, त्याची गोडी कांही औरच आहे!"

मला अनिलांच्याच कांही ओळी आठवल्या—

एकेक आहे तो जिवंत क्षण
आणि त्यांतल्या निराशांनीहि
दाखविल्या मला आहेत दिशा
उजळलेल्या

जीवनाकडे बघण्याच्या अप्पासाहेबांच्या ह्या आशावादी मनोवृत्तीचा ठाव घेण्याकरिता एकदा मीं त्यांना मुद्दामच म्हटलें—

'कांही म्हणा, अप्पासाहेब, पण संध्याकाळच्या ह्या उत्तरार्धांत मनाला थोडी-फार खिन्नता अकारणच येते!'

'वा महाराज!'—अप्पासाहेब हसत हसत म्हणाले, 'अहो! ही वेळ तर फारच सुखद! दिवसभरच्या परिश्रमाचा परिहार आपल्या नकळत होत असतो ह्या वेळीं! किती मजेदार अनुभव असतो तो! मला फार आवडते ही वेळ!!'

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवि अनिलांचीं कित्येक उत्तमोत्तम सुरेख व सरस भावगीतें त्यांच्या भावनांच्या निर्मलतेची साक्ष परस्परच देतील. 'अत्युत्कट भावनांचा सहजोद्गार'– हें भावगीताचें स्वरूप हृदयाच्या भाषेंत लिहिलेलीं अनिलांचीं सर्वच भावगीतें सहजसुंदर आहेत. स्वच्छ प्रशांत जलाशयाच्या खोलीचा अंदाज तर लागूं नये आणि तरीहि त्याचा तळ मात्र स्पष्ट दिसावा, तसें अनिलांच्या भावगीतांचें आहे. जॉर्ज हर्बर्टच्या—

A man that looks on glass
On it may stay his eye;
Or if he pleaseth through it pass
And then the heaven espy.

ह्या पंक्तींतील 'heaven' शब्दाचा अर्थ 'विशुद्धतेचें साम्राज्य' असा घेतला, तर ह्या पंक्ती अनिलांच्या भावगीतांच्या वर्णनपर म्हणून ठरायला हरकत नाहीत.

कांही प्रसंगीं निर्मल भावनांचाहि प्रक्षोभ अटळ असतो. हृदयांतल्या अत्युत्कट भावना जणूं कांही हृदय फोडून बाहेर पडतात आणि बुद्धीवर आघात करूं लागतात. हा प्रक्षोभ, हे सात्विक विकारप्राधान्य उत्तम काव्यनिर्मितीलाहि कारणीभूत होऊं शकतें. कवि अनिलांच्या ह्या प्रकारच्या कविता किती उत्कृष्ट उतरलेल्या आहेत, हें त्या कविता वाचूनच कळायचें. अनिलांच्या प्रतिभेची ही चमक आकर्षक आहे. त्यांच्या असल्या सर्वच कवितांतून प्रक्षोभाच्या पोटीं उत्पन्न झालेली जी 'वैचारिक अस्वस्थता' दर्शन देते, तीहि हुरहूर लावणारी आहे.

अनिलांच्या कितीतरी कवितांची गोडी अवीट आहे. त्यांच्याच भाषेंत त्यांच्या काव्याविषयीं—

मधु न त्यांतला सरे म्हणें न मीहि त्या पुरे—

असें कुणी म्हणूं शकेल.

ज्यावेळीं मुक्तछंदाचें नांवहि निघालें नव्हतें, त्यावेळीं १९२३-२४ मध्येच अनिलांनी एक दीर्घ काव्य लिहायला घेतलें होतें. तें काव्य सात आठशें ओळी लिहून त्यांनी तसेंच सोडून दिलें. त्या काव्याचें नांव 'प्रतिभा'. 'प्रतिभा' काव्यासाठी एका नवीन मात्रिक मुक्तछंदाची योजनाहि त्यांनी त्यावेळीं केलेली होती. तो मुक्तछंद त्यावेळीं ते रूढ करूं शकले नाहीत. तथापि नंतर त्यांचें 'प्रेम आणि जीवन' हें पहिलें दीर्घ काव्य त्यांनी जेव्हा लिहिलें, तेव्हा तें निर्माण होतांना त्या काव्याला साजेसा छंदहि घेऊन आलें. तो पांच आणि सहा अक्षरी चरणकांच्या स्वैर जुळणीचा मुक्तछंद होता. तोच आता रूढ झालेला आहे.

अनिलांच्या अलिकडे प्रसिद्ध झालेल्या 'मानव्य' कवितेंतील मुक्तछंदाचा उल्लेख या ठिकाणीं करायला हवा. चरणकांच्या दृष्टीने या कवितेंतील मुक्तछंदाचें तंत्र दोन अक्षरी व तीन अक्षरी चरणकांचें आहे. ओळींची रचना आघातांच्या आंदोलनाप्रमाणे असून आघात शब्दोच्चारांतील आघातार्शी जुळतील, असे आहेत.

मराठी कथनात्मक कवितांविषयीं अनिलांचें एक विशिष्ट मत आहे. "कथन हा काव्याचा विषय आधुनिक लघुकथांनी व्यापल्यामुळे आता काव्याच्या विषयाच्या दृष्टीने क्रांतिकारक प्रयोग करणें आवश्यक झालें आहे" असें ते म्हणतात. आणि 'निर्वासित चिनी मुलास' हें खंडकाव्य लिहून आधुनिक खंडकाव्याचें स्वरूप त्यांनी सप्रयोग स्पष्ट करून दाखविलें आहे.

'काव्य' हाच अनिलांच्या लेखनाचा विशेष! इतर जें थोडेंबहुत लेखन
 त्यांनीं केलें, तें आनुषंगिकच. त्याचप्रमाणे, त्यांनी जीं मोजकीं भाषणें केलीं, तींहि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंबई येथें दिनांक २३-९-१९४४ रोजीं 'काव्य आणि क्रांति' ह्या विषयावर केलेल्या भाषणांत ते म्हणाले.

'काव्याने प्रचार होईल, पण प्रचाराचें काव्य मात्र होणार नाही. आणि आता कवींनी 'हस्तीदंती मनोऱ्यांत' बसून चालणार नाही, समाजाशीं अभिमुख झालें पाहिजे. साऱ्या जीवनाशीं त्यांतल्या चिरंतन, अप्रतिहत क्रांतीशीं, समरस, सहानुकंपी, सहानुभवी व समहृदय बनलें पाहिजे. त्या जीवनाचा जिवंत अनुभव मिळविला पाहिजे. आत्मप्रत्यय अंगीं बाणला पाहिजे, साक्षात्कार झाला पाहिजे आणि त्यांतून मिळालेल्या स्फूर्तीने काव्य झालें पाहिजे.

त्याचप्रमाणे दिनांक २१ जुलै १९४७ रोजीं पुणे येथे केलेल्या भाषणांत ('साहित्य आणि सांस्कृतिक पुनरुत्थान') ते म्हणतात—

'आता साहित्याला आणि कलेला आवाहन देण्याची वेळ आली आहे. एकापरी राजकीय लढा संपला—आता जर आपलें सांस्कृतिक पुनरुत्थान झालें नाही, आपण जर नवसंस्कृति निर्माण करूं शकलों नाही, तर हें स्वातंत्र्य नुसतें पोकळ राहणार !

संस्कृतीचें पुनरुज्जीवन म्हणजे काय, हें स्पष्ट करतांना ते म्हणतात—

संस्कृतीचें पुनरुज्जीवन म्हणजे तिच्यांतील मूलभूत असें चैतन्य आणि तिचा विशिष्ट असा आत्मा कायम ठेवून तिचा खऱ्या खऱ्या अर्थाने कायाकल्प करणें होय—जुन्याशीं विरोधी नाही, पण जुन्यांतले सर्व दोष नाहींसे झालेले, अपूर्णता पूर्ण झालेल्या, असें त्या देहाचें रूप असतें !

औरंगाबाद नभोवाणीवर केलेल्या भाषणांत 'मी का लिहितों ?' हें त्यांनीं सांगितलें. ते म्हणतात,

'ह्यापुढे मी का लिहीत आहे, असें जर कोणी मला विचारलें, तर थोड्याशा आत्मविश्वासाने मी म्हणूं शकेन की, माझें मन जीर्ण जगाच्या अमानुष अर्थव्यवस्थेच्या संस्कृतीला विटलें आहे. तीविषयीं माझ्या मनांत द्वेष भरला आहे व नव्या जगाची मला ओढ लागली आहे !

'प्रक्षोभ' ह्या नवीन रसाच्या स्थापनेचा प्रयत्नहि कवि. अनिल करीत आहेत.

अप्पासाहेब वाशीमला होते, तेव्हा अनेक प्रसंगीं 'गप्पा-मंडळ' त्यांच्या बंगल्यावर वा आमच्या इथे स्थापन व्हायचें ! येथील कॉलेजांतील विद्वान् अध्यापक मंडळी असायची आणि चर्चा, विवाद, कोट्याप्रतिकोट्या, विनोद आणि हास्य यांना भरती यायची. असल्या तऱ्हेच्या बैठकी रंगविण्याची त्यांची हातोटी अवर्णनीय आहे. तासन् तास केव्हाच निघून जायचे.

बरेच वेळां निवडक मंडळी असली, म्हणजे अप्पासाहेबांच्या कांही कविताहि 'मुखेंच कविच्या' ऐकायलाहि सापडायच्या ! अप्पासाहेबांच्या तोंडून 'मुक्तछंद' ऐकतांना तो गेय आहे की नाही, हा विचारच मनांत येऊं नये इतका अप्पासाहेब तो सुरेख म्हणतात.

अप्पासाहेब परवा-परवापर्यंत यवतमाळला होते आणि मधून मधून त्यांच्या सहवासाचा लाभ मला सुलभ असे. आता ते नागपूर येथे सामाजिक शिक्षणा (Social Education)चे डेप्युटी डायरेक्टर म्हणून बदलून गेलेले आहेत. त्यामुळे आता त्यांचा सहवास योगायोग घडवील तेव्हाच ! ●●●

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरा

वि. स. वाकसकर

● बडोद्याचे सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक रा. वाकसकर यांनी ज्ञानदेव दोन होते, हा कै. भारद्वाज यांचा सिद्धांत पुन्हा मांडण्याचा उपक्रम सुरू केला आहे. याबाबत त्यांचे कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत व होणार आहेत. प्रस्तुत लेख त्यांपैकींच एक होय.

'ज्ञानेश्वरी' लिहिणारा ज्ञानदेव नाथपंथी असून त्याची समाधि आपेगांवास आहे, तर अभंगकार ज्ञानदेव वारकरी पंथाचा असून त्याची समाधि आळंदीस आहे—हा वाकसकरांचा मुख्य मुद्दा आहे. हा मुद्दा दोन ज्ञानदेवांच्या भिन्न गुरुपरंपरा दाखवून या लेखांत सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे.

✶

आपेगांवचा योगी आणि आळंदीचा वारकरी असे दोन ज्ञानदेव अनुक्रमें तेराव्या आणि पंधराव्या शतकांत होऊन गेले. योगी ज्ञानदेवाने ज्ञानेश्वरीमध्ये स्वतः बद्दल असें लिहिलें आहे की,

तेथ महेशान्वयसंभूतें । श्री निवृत्तिनाथसुतें ।
केलें ज्ञानदेवें गीतें । देशीकार लेणें ॥ १८० ॥

यावरून योगी ज्ञानदेव हा श्री निवृत्तिनाथाचा मुलगा होता व त्याचें आडनांव 'महेश' सारखें 'महिशी', 'पाडे' असें कांहीं तरी असावें, असें दिसतें. 'पाडे, रेडे' हीं आडनांवें आजहि यजुर्वेदी समाजांत आहेत आणि योगी ज्ञानदेव हे यजुर्वेदी ब्राह्मण होते, असें त्यांच्या ज्ञानेश्वरींतील भाषेवरूनहि दिसतें. वारकरी ज्ञानदेवाने रेड्याच्या तोंडून वेद वदविण्याचा चमत्कार केल्याच्या दंतकथेच्या मूळाशीं योगी ज्ञानदेवाचें 'महेश' सारखें आडनांव असावें. वारकरी ज्ञानदेव हा संन्याशाचा मुलगा असल्याचें प्रसिद्धच आहे. आज या दोनहि ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरा कथन करावयाच्या आहेत.

२ योगी ज्ञानदेवानंतर शें दीडशें वर्षांनी वारकरी ज्ञानदेव झाला. दोघांचेहि पंथ भिन्न असल्याने त्यांच्या गुरुपरंपराहि पृथक् पृथक् असावयास पाहिजेत. परंतु दोन ज्ञानदेवांचा एकच ज्ञानदेव बनविल्याने गुरुपरंपराहि एकच असल्याचें प्रसिद्ध आहे. सूक्ष्मपणें संशोधक वृत्तीने पाहतां योगी ज्ञानदेवाची गुरुपरंपरा त्यानेच

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सांगितली असून वारकरी ज्ञानदेवाची गुरुपरंपरा इतरांनी लिहिलेली आहे, असें स्पष्टच दिसतें. योगमार्गाचा प्रणेता जो त्रिपुरारि शंकर त्याच्यापासून आपल्या नाथपंथाची परंपरा ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायांत आढळते. गीतेच्या १८ व्या अध्यायांत ७८ श्लोक आहेत. परंतु त्या ७८ श्लोकांचें विवेचन ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायांत १८१० ओव्यांमध्ये केलें आहे. त्या १८१० ओव्यांपैकी शेवटच्या ११० ओव्यांत ज्ञानेश्वराने इतर वर्णनाबरोबरच आपली गुरुपरंपरा पुढीलप्रमाणे लिहिली आहे:—

क्षीरसिंधु परिसरीं। शक्तीच्या कर्णकुहरीं।
नेणों कै त्रिपुरारी। सांगितलें जें ॥ १७५१ ॥
तें क्षीरकल्लोळा आंतु। मकरोदरीं गुप्तु।
होता तयाचा हातु। पैठें जालें ॥ १७५२ ॥
तो मत्स्येंद्र सप्तशृंगीं। भग्नावयव चौरंगी।
भेटला की तो सर्वांगीं। संपूर्ण जाला ॥ १७५३ ॥
मग समाधि अव्यया। भोगावी वासना यया।
ते मुद्रा श्रीगोरक्षराया। दिधली मीनीं ॥ १७५४ ॥
तेणें योगाब्जिनी सरोवरु। विषयविध्वंसैकवीरु।
तिये पदीं का सर्वेश्वरु। अभिषेकिला ॥ १७५५ ॥
मग तिहीं तें शांभव। अद्वयानंद वैभव।
संपादिलें सप्रभव। श्रीगहिनीनाथ ॥ १७५६ ॥
तेणें कळि कळितु भूतां। आला देखोनि निरुता।
ते आज्ञा निवृत्तिनाथा। दिधली ऐसी ॥ १७५७ ॥
ना आदि गुरु शंकरा। लागोनि शिष्यपरंपरा।
बोधाचा हा संसारा। जाला जो आपुलें ॥ १७५८ ॥

या आठ ओव्यांतील पहिल्या ओवीमध्ये आद्य गुरु त्रिपुरारि जो महादेव त्याचें वर्णन आहे. दुसरीमध्ये मत्स्येंद्रनाथाला उपदेश लाभल्याचें सांगितलें आहे. तिसऱ्या ओवींत भग्नावयव चौरंगीनाथाला मत्स्येंद्राचें दर्शन झाल्यावर तो पूर्णावयवी झाल्याचा चमत्कार निवेदिला आहे. व त्यानंतर गोरक्ष–गहिनी–श्रीनिवृत्ति ही पुढील शिष्यपरंपरा कथन केली आहे. मत्स्येंद्रनाथाचा समाधिसन इ. स. १२१० व श्रीनिवृत्तिनाथाचा समाधिसन इ. स. १२९९ आहे. हें पाहिलें म्हणजे वरील गुरुपरंपरा विश्वसनीय वाटते.

३ ज्ञानेश्वराची शिष्यपरंपराहि प्रसिद्ध आहे. शैली, पुंगी, कंथा, तोडा, शिपाई–पागोटें हीं नाथपंथाचीं चिन्हें होत. ज्ञानेश्वराच्या शिष्यपरंपरेंतील सातवे सत्पुरुष 'शिवादिननाथ' होत. त्यांचा मठ पैठणास गोदावरीच्या काठीं असून त्याला अनेक संस्थानिकांकडून सुमारें पंचवीस हजारांची जहागीर आहे. देवास संस्थानिकांचें हें गुरुघर असल्याने मठाची व्यवस्था देवास संस्थानच्या देखरेखीखालीं चालत असते. हें विस्ताराने सांगण्याचा हेतु इतकाच की, ज्ञानेश्वर हे वारकरी नसून नाथपंथाचे शिवोपासक होते, हें त्यांच्या शिष्यपरंपरेंतील शिवादिननाथाच्या या पैठणच्या मठावरून आजहि सिद्ध करितां येते. योग्यासंबंधाने ज्ञानेश्वर म्हणतात:—

अगा योगी जो म्हणिजे। तो देवाचा देव जाणिजे।
आणि सुखसर्वस्व माझें। चैतन्य जो ॥ ४८२ ॥ अ. ६

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४ आतापर्यंत योगी ज्ञानदेवाची गुरु-शिष्य-परंपरा सांगितली. यापुढे वारकरी ज्ञानदेवाची सांगतों.

इंद्रायणी महातटीं । विलसलों श्रीगुरुचरणीं ।
बोलियेलें ज्ञानदेवें ॥ संतोषलों वो मनीं ॥ १ ॥
निवृत्ति सखा माझा । दीन दयाळ श्रीगुरु ।
अलंकापुरीं स्थापियेलें । दिधला विठ्ठल उच्चारु ॥ २ ॥

या अभंगांत इंद्रायणी नदी, अळंकापुरी नगरी आणि विठ्ठल देव अशा तीन शब्दांचा उल्लेख आहे. परंतु सबंध ज्ञानेश्वरीच्या नऊहजारांवरील ओव्यांत यांपैकी एकाचाहि निर्देश नाही. आपेगांवच्या ज्ञानदेवाचा संबंध इंद्रायणी नदी आणि अळंकापुरी नगरी यांच्याशीं नव्हता व विठ्ठल हा आजचा पांडुरंग देव पंढरीच्या देवळांत इ. स. १२७७ पर्यंत नव्हता हें शिलालेखाच्या आधारें सिद्धच आहे. (अभिरुचि मासिक जानेवारी १९४८ पृष्ठ ५०९)

५ निवृत्ति-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाई हीं चार भावंडें एका संन्याशाचीं मुलें असल्याचें प्रसिद्धच आहे. दोनहि ज्ञानदेवांच्या गुरूंचीं नांवें 'निवृत्ति' च होतीं. आपेगांवच्या ज्ञानदेवाचा गुरु निवृत्ति हा त्या ज्ञानदेवाचा पिता होता आणि आळंदीच्या ज्ञानदेवाचा गुरु निवृत्ति हा त्या ज्ञानदेवाचा वडील भाऊ होता, असा प्रकार पाहिला, म्हणजे हे दोन ज्ञानदेव निरनिराळे महापुरुष होते, हें स्पष्टच प्रतितीस येते. योगी ज्ञानदेवाने आपली प्राचीन गुरुपरंपरा ज्ञानेश्वरींत सांगितली, ती वर उद्धृत केलीच आहे. वारकरी ज्ञानदेवाने तशी सांगितली नाही. परंतु ह. भ. प. भिंगारकरबुवांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वर चरित्रांत पृष्ठ ४१ वर गहिनीनाथ, मत्स्येंद्रनाथ, दत्त व शंकर हे चौघेजण ज्ञानेश्वरादि चार भावंडांस त्र्यंबकेश्वराजवळील ब्रह्मगिरीच्या गुहेंत भेटले व यांतील एक गहिनीनाथ या गुरूने निवृत्तिनाथास उपदेश दिला व पुढे निवृत्तीने ज्ञानदेवास उपदेशिलें, असें लिहिलें आहे. हा गहिनीनाथाने दिलेला उपदेश नाथपंथाचाच असावा. परंतु निवृत्तीने मात्र ज्ञानदेवास तो न देतां 'विठ्ठलरखुमाई' भक्तीचा दिला हें स्पष्टच दिसतें. तें कांहीहि असलें, तरी या संबंधीं तर्कवितर्क करण्यांत काही अर्थ नाही. ब्रह्मगिरीच्या गुहेंत जें मंडळ जमलें, त्या मंडळांतील एका व्यक्तीचाच आपण अधिक विचार करूं, म्हणजे त्या मंडळासंबंधीं आपणांस निश्चित कल्पना करितां येईल. कारण ती व्यक्ति नाथसंप्रदायांतील नाही. या मंडळाची नांवनिशी वारकरी ज्ञानदेवाने सांगितलेली नाही. दोन ज्ञानदेवांचा एकच ज्ञानदेव झाला, ही भावना उत्पन्न झाल्यावर ही यादी अथवा नांवनिशी बनविलेली दिसते.

ब्रह्मगिरीच्या गुहेंत जे प्राचीन महापुरुष ज्ञानदेवादि चार भावंडांस भेटले, त्यांत 'दत्त' या देवाचें नांव आहे. दत्त हा देव नाथसांप्रदायांतील असता, तर योगी ज्ञानदेवाने आपल्या ज्ञानेश्वरींत त्याचें नांव एकदां तरी लिहिलें असतें. परंतु आश्चर्य हें की, सबंध ज्ञानेश्वरींत दत्त या देवाचें नांव नाही. किंबहुना, दत्त हा देव अथवा त्याची भक्ति योगी ज्ञानदेवाच्या काळांत (शके १२१२ + ७८ = १२९०) म्हणजे इसवी सनाच्या तेराव्या शतकाच्या अखेरीसुद्धा जाहीर प्रचारांत आली नव्हती, कारण ही दत्तोपासना नरसिंहसरस्वती या साधूने इसवी सनाच्या पंधराव्या शतकांत (म्हणजे शके १३८० + ७८ = १४५८ इ. स. मध्ये) प्रचालित केली,

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें ज्ञानकोश (भाग ६ पृष्ठ ३३) वरूनहि सांगतां येतें. दत्ताच्या उपस्थितीमुळे नाथसांप्रदायांत काय परिस्थिति उत्पन्न होते, ती पाहा.

नाथपंथ हा युद्धप्रिय शिष्यांचा सांप्रदाय आहे. लढवैया गोसाव्यांच्या अनेक व प्रचंड पलटणी मराठशाहीअखेरपर्यंत युद्धकार्यांत मग्न असल्याचें इतिहासावरूनहि सिद्ध आहे. योगी ज्ञानदेवाच्या गुरुपरंपरेंत पहिला मत्स्येंद्र व दुसरा गोरख हीं नांवें मागें सांगितलींच आहेत. या गोरखनाथाचें मंदिर नेपाळांत आहे आणि त्याचा शिष्यवर्ग 'गुरखे' या अभिधानाने आजहि अप्रतिम योद्धा म्हणून सर्वमान्य आहे. ज्ञानेश्वरी हा वेदांन्तानिरूपण करणारा ग्रंथ, पण त्यांत शस्त्रास्त्रें, डंका, रणवाद्यें, धनुष्य, हत्यार, शस्त्रधारी, योद्धा, कुस्ती, मल्ल, ढाली, तलवारी, वज्रकवच, यांत्रिक साधनें, असे सैन्यविषयक उल्लेख पुष्कळच आहेत. उदाहरणार्थ, एक दोन ओव्याच यापुढे देतों. त्यायोगें मुख्य मुद्दा थोडा मागे पडतो, पण निरुपाय आहे.

ज्ञानेश्वरींत युद्धसंबंधीं पुढील उद्गार आहेत.

जैसा भरलेया त्रिभुवना- । आंतु एक एकु चांगु अर्जुना
निवडूनि कीजे सेना । लक्षवरी ॥ ११ ॥ अ. ७
की तयाही पाठीं । जे वेळां लोह मांसाते घांटी ।
ते वेळीं विजयश्रियेच्या पाठीं । एकुचि वैसे ॥ १२ ॥ अ ७

२

की जीवनृपाचे वारु उपलाणें । घेऊनि इंद्रियांचीं केकाणें ।
विषयदेशींचें नागवणें । आणिती जे ॥ ४६४ ॥ अ. १८

पहिल्या दोन ओव्यांत लढवैयांची निवड, शस्त्रास्त्रांचे संपात, हजारोंचें बळी जाणें आणि एकाच्याच नांवें विजयश्री गाजणें असें वर्णन असून दुसऱ्या उदाहरणांत जीवराजाचे इंद्रियरूपी घोडे, त्यांची दौड, सुखदुःखांची लूट हे सार्वत्रिक प्रकार मार्मिकपणें निवेदिले आहेत.

नाथपंताच्या शिपाईगिरीचें वर्णन ज्ञानेश्वरीमध्ये आहे. वारकरी समाज शांतताप्रिय आहे. ह. भ. प. भिंगारकरकृत ज्ञानेश्वरचरित्रांतील गुरुसंमेलनांत दत्त ही देवता आहे. परंतु दत्त देव सात्त्विकगुणाचा पुतळा असल्याने तो युद्धप्रिय समाजांत बसत नाही. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचें चरित्र श्री. जोशी यांनी लिहून नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे; त्यांत पृष्ठ ७२ वर 'दत्ताच्या रौद्र ध्यानाचें' चित्र आहे. तें चित्र फडक्यांच्या घराण्यांत सुमारे सतराव्या शतकापासून असावें असें वाटतें. त्या चित्रांत दत्ताला एक मुख, पण साहा हात आहेत. दत्ताला तीन मुखें असतात, हें प्रसिद्धच आहे. परंतु या चित्रांत एकच मुख असल्याने दत्तसांप्रदायाचा अर्वाचीनपणाच प्रत्ययास येतो. वारकरी ज्ञानदेवाच्या प्राचीन गुरुमंडळींत दत्त हें नांव असल्याने ती नामावली पंधराव्या शतकांतील दिसते. त्या गुरुपरंपरेचा शिष्योत्तम निवृत्ति हा योगी ज्ञानदेवाचा गुरु होणें अगदी अशक्य आहे. फार तर तो वारकरी ज्ञानदेवाचा गुरु असणें शक्य आहे. नाथपंथाच्या शिष्याने आपल्या ज्ञानदेव शिष्याला वारकरी पंथाची दीक्षा कां दिली, अशीहि शंका येईल, पण आपणांस त्या शंकांचें प्रयोजन नाही. या संबंध लेखाचें तात्पर्य इतकेंच की, योगी ज्ञानदेव आणि वारकरी ज्ञानदेव असे दोन महापुरुष सुमारे शेदीडशे वर्षांच्या अंतराने झाले असून त्यांच्या गुरुपरंपराहि निरनिराळ्याच होत्या. योगी ज्ञानदेव हा नाथसांप्रदायी होता आणि वारकरी ज्ञानदेव हा बहुधा रामानंद सांप्रदायांतील असावा.

●●●

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत, १९२३

अनुक्रमणिका

मराठी नाटकांतील विनोद–विकास

मोरेश्वर दत्तात्रेय अत्रे,
एम्. ए., एल् एल्. बी.

• या लेखाचा पूर्वार्ध मार्च अंकीं आला होता. या अंकीं उत्तरार्ध प्रसिद्ध होत आहे.

—उत्तरार्ध

●

मराठी नाट्यांतील विनोद–विकासांत अत्रे यांचा चौथा, म्हणजे शेवटला टप्पा येतो. कोल्हटकर यांचा पहिला, गडकरी यांचा दुसरा, माधवराव जोशी यांचा तिसरा आणि अत्रे यांचा चौथा टप्पा होय. आतापर्यंतच्या नाटकांतील विनोद पाहिलें आणि अत्र्यांच्या विनोदाकडे पाहिलें, तर आपल्याला असें आढळून येईल कीं, आतापर्यंत विनोद निर्माण करणारे नाटककार, 'ऑफ' कडे अगर 'लेग' कडेच विशिष्ट तऱ्हेने खेळणाऱ्या क्रिकेटपटूसारखे होते. विशिष्ट फटके त्यांना चांगले मारतां येत असत. पण अत्र्यांचा विनोद म्हणजे, सारख्या कुशलतेने चौफेर फटके मारणाऱ्या क्रिकेटपटूसारखे आहे. आणि, असल्या क्रिकेटपटूला, शंभर धावा पूर्ण झाल्यावर, जर एकादे वेळेस षट्कार मारण्याची इच्छा झाली–आणि ती होतेच–तर त्याच वेळेस त्याची दांडी जाण्याचा संभव असतो. अत्र्यांची दांडी अशा वेळीं हमखास जाते !

अत्रे यांची समाजाकडे पाहण्याची चोखदळ दृष्टी, विविध स्वभावांचें बारीक निरीक्षण, रोजच्या व्यवहारांत दिसणारे विनोदी प्रसंग, कल्पनेचें नाविन्य, विशिष्ट ठिकाणीं घडणाऱ्या विशिष्ट गोष्टी यांची बरोबर माहिती, समाजांतील चालीरींतीचें बारीक निरिक्षण–ह्यांचा भरपूर उपयोग त्यांनी आपल्या नाटकांतील विनोदासाठी केल्यामुळे त्यांचा विनोद बऱ्याच ठिकाणीं सहजसुलभ झाला असून तो अनेक विविध गोष्टींवर आधारलेला असल्याने नाविन्यपूर्ण आहे. त्यांची समाजाकडे, अन्यायांकडे, चालीरीतींकडे पाहाण्याची दृष्टी खेळकर आहे आणि त्यामुळे त्यांचा विनोद खेळकर झाला आहे. व्यवहारांत दिसणाऱ्या साध्या गोष्टींना विनोदी स्वरूप देऊन वाचकांना त्यांनी हसायला लावलें आहे. गळ्यांतील जानवें खांद्यावरून खाली गेल्यामुळे, तें पुन: पूर्ववत् करण्यासाठी 'भ्रमाच्या–भोपळ्यां'त सरदारांनी हात वर केल्याने टांगेवाला थांबला आहे ! त्यांच्या विनोदावर कोल्हटकर व गडकरी यांचा परिणाम झाला आहे. आपल्या नाटकांतील पात्रांचीं नांवें सुद्धा त्यांनी विनोदी व नाविन्यपूर्ण दिलीं आहेत. 'साष्टांग नमस्कार' सारख्या साध्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयावर त्यांनी शंभर पानांचें विनोदी नाटक लिहिले आहे. ' साष्टांग–नमस्कार ' नाटकांतील विनोद हा खेळकर विनोदाचा उत्कृष्ट नमुना आहे. कवीच्या मनांत ज्या ज्या कल्पना–गोष्टी थैमान घालीत असतात, ज्या ज्या गोष्टींचें कवीला वेड असतें, त्या त्या आणि तेवढ्याच सर्व गोष्टींना विनोदाचा उजाळा देऊन थोडें विडंबनात्मक असें कवि भद्रायूचें पात्र रेखाटलें आहे. त्याचप्रमाणे, साष्टांग नमस्काराचें वेड असलेल्या रावबहादूर शेषाद्रीचें, ज्योतिषांचें वेड असलेल्या सिद्धेश्वराचें, 'लग्नाच्या बेडी'तील लग्नाचें वेड असलेल्या ब्रह्मचारी अवधूतचें हीं स्वभाव चित्रणें, मराठी नाट्य–वाङ्मयांतील उत्कृष्ट विनोदी स्वभाव चित्रणें होत. विनोदी स्वभावचित्रणाला आरंभ आपल्याला श्री. प. जोशी ह्यांच्या ' खडाष्टक ' नाटकांतून दिसतो. पण वक्रतुंडाचा अगर कर्कशरावाचा विनोदाचा झरा एकाच बाजूनें वाहत असल्याने त्यांत विविधता नाही, कारण व्यक्तींच्या स्वभावांच्या निरनिराळ्या पैलूंवर तो विनोद आधारलेला नाही. अत्रे यांनी एका विशिष्ट गोष्टीचें वेड असलेल्याचें एक एक स्वतंत्र विनोदी स्वभावचित्रण गुंफलें आहे, आणि वरील प्रत्येक स्वभाव चित्रणाभोंवती जो विनोद निर्माण केला आहे, तो विनोद त्या त्या व्यक्तींच्या वेडाला अनुरूप असाच निर्माण केला आहे. उदा० सिद्धेश्वर आयुष्यांत कोणतीहि वाईट गोष्ट घडली की, लगेच सांगतो, " याला कारण माझे स्टार्स वाईट होते ना ! " तसेंच, रावबहादूर शेषाद्री सुद्धा म्हणतात, " भद्रायूंना चांगल्या कविता का करतां येत नाहीत, तर तो साष्टांग नमस्कार घालीत नाही म्हणून ! " म्हणजे, प्रत्येक पात्र प्रत्येक गोष्टीच्या कार्यकारण भावाचा संबंध आपापल्या विशिष्ट वेडाशी गोवत असतें. त्यामुळे त्या विनोदी व्यक्ति आपल्या भोंवती कुठेतरी वावरत आहेत, असें दिसतें; भद्रायू—सिद्धेश्वर, शेषाद्रि–अवधूत ह्या पात्रांचा विनोद स्वभावानुकूल असून नाट्यानुकूल सुद्धा आहे. तो कुठेच बोचक नाही, कंटाळवाणा नाही, पण यथार्थ स्वभावचित्रण करणारा आहे. यथार्थ विनोदी स्वभावचित्रणें हीं अत्रे यांनी मराठी नाटकाला दिलेली देणगी आहे. ' साष्टांग–नमस्कारां ' तील विनोदासारखा खेळकर आणि सोज्वळ विनोद दुसऱ्या कोणत्याहि नाटकांत नाही आणि ' पराच्या कावळ्यां ' तील विनोदासारखा कृत्रिम आणि बाष्कळ विनोदहि दुसऱ्या कोणत्याच नाटकांत नाही ! नाटकांत विनोद कसा नसावा, याचीं बरचशीं उदाहरणें आपल्याला ' पराच्या कावळ्यांत ' सापडतील. ' पराच्या कावळ्यां ' तील विनोद समजण्यासाठी त्यांना विशिष्ट गोष्टींचा उल्लेख तळटीपेंत करावा लागला आहे ! स्थानिक गोष्टींवर अगर व्यक्तींवर आधारलेला विनोद सर्व साधारण लोकांना आवडूं शकत नाही. (' पराचा कावळा ' पान ६६)

अंबादास—" तीं शौचकुपांतील टाकी फुटली ! जा, मॅनेजरला जाऊन सांग ! चांगलीच भानगड झाली ,

वासंती—म्हणजे, काय झालं ?

अंबादास—कशाला मी ती साखळी ओढायला गेलों, कोणास ठाऊक ! जें एकदम धो–धो–धो पाणी सुरू झालं, म्हणतेस—ह्या ठिकाणचा अत्यंत हीन आणि गलिच्छ विनोद निर्माण होण्यास कारण अत्रे यांचा साध्या गोष्टींना विनोदी स्वरूप देण्याचा आत्यंतिक हव्यास, हेंच म्हणतां येईल. त्यांत, त्यांना कोणत्या गोष्टींचा उपयोग विनोदासाठी करावा आणि करूं नये, याचें तारतम्य विनोदाच्या मोहापुढे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहत नाही. आणि, अत्र्यांचा साधारण प्रतीचा अगर हीन विनोद निर्माण होण्यास हें एक प्रमुख कारण आहे.

'मी उभा आहे' ह्या नाटकांत, नाटकाच्या शेवटीं, भाई टोळ आणि ताई पोळचें लग्न झालेलें गोवर्धनला माहीत नसतें. त्याचप्रमाणे, ताई पोळ निवडणुकींत निवडून आल्याचेंहि त्याला माहीत नसतें.

गोवर्धन—तुमचा म्युनिसिपालटीचा काय संबंध ?

भाई टोळ—वा ! म्युनिसिपालटी आता आमच्या घरांत आली ! आता म्युनिसिपालटीशी आमचा रोजचा संबंध ! (पा. १२५)

ह्या ठिकाणीं 'संबंध' ह्या शब्दावर सूक्ष्म, पण अश्लील कोटी आपल्याला दिसते.

अत्रे यांनी संपूर्ण राजकीय पार्श्वभूमीवर असें एकच नाटक लिहिलें आहे आणि तें म्हणजे 'वन्दे मातरम्.' मुंबई इलाख्यांत १९३७ सालीं जें हंगामी मंत्रिमंडळ स्थापन झालें होतें, त्याची पार्श्वभूमी ह्या नाटकाला आहे. त्यांत प्रामुख्याने वावरणाऱ्या व्यक्ति ह्या नाटकांतील पात्रें आहेत. सामाजिक आणि राजकीय हिताच्या दृष्टीने काँग्रेस मंत्रिमंडळ बनविण्याचें नाकारलें असतांना दुसऱ्यानीं मंत्रिमंडळ बनवूं नये, अशी सर्वसामान्य जनतेची इच्छा होती. आणि, ह्या पार्श्वभूमीवर अत्रे यांनी 'वंदे-मातरम्' लिहिलें. हंगामी मंत्रिमंडळावर विनोदाचे कोरडे अत्र्यांनी ओढले आहेत. पण ते कोरडे त्या व्यक्तींना सूचना देण्याइतके बोचक, पण प्रेमाने ओढलेले असल्यामुळे आपल्याला हसूं येतें. हास्यास पात्र झालेल्या व्यक्तींबद्दल अगर संस्थांबद्दल द्वेष वाटत नाहीं. तरी पण ह्या नाटकांतील विनोद, तत्कालीन घडामोडी व व्यक्ति माहित असेल त्यांनाच जास्त आनंद देऊं शकेल. ह्या नाटकांत उपहासाचा आणि विडंबनाचा भरपूर उपयोग नाटककाराने केला आहे. ह्या नाटकांतील विनोद पात्रांच्या स्वभावांचें मार्मिक दर्शन घडविण्यास मदत करणारा आहे.

सोमेश्वर— ... ... गायकवाड वाड्यांत सुपारीचें खांड देखील माझ्याशिवाय कधी फुटत नव्हतं.

त्रिभुवन—बरोबरच आहे. एवढा भरभक्कम दगड जवळ बाळगल्याशिवाय लोकमान्यांना तरी सुपारी कशी फोडतां येणार ? (पा. २२).

जॉर्ज गॉर्डन आपल्या 'शेक्सपिअरीन कॉमेडी' ह्या पुस्तकांत म्हणतात, "and shakespeare, from this hint, makes them talk like fools. But with what tolerance! with what humorus affection!" हें विधान अत्र्यांच्या 'वंदे-मातरम्' ला बरेचसें लागूं पडतें. अत्रे यांच्या नाटकांतून साधारण प्रतीचा बाष्कळ आणि अश्लील विनोदहि बऱ्याच ठिकाणीं सांपडतो. विनोदाच्या मोहामुळे 'उद्याचा संसार' आणि 'घराबाहेर' ह्या नाटकांतील कांही प्रसंगांना गालबोट लागलें आहे. नाटकांतून जर अस्थानीं विनोद असला तर त्या प्रसंगाची गंमत जाऊन तो त्याला बाधक होतो. गडकरी यांच्या इतका अत्रे यांचा विनोद बोचक नाही. शारीरिक व्यंगांवर अत्रे यांनी विनोद केला नाहीं. चमत्कृतिजन्य विनोद 'भ्रमाच्या भोपळ्या' व्यतिरिक्त आपल्याला फारसा सापडत नाहीं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माधवराव जोशी ह्यांनी बहुजनसमाजाचीं प्रातिनिधिक पात्रें आपल्या नाटकांतून निवडलीं आहेत आणि अत्रे ह्यांनी पांढरपेशा समाजाचीं प्रातिनिधिक पात्रें निवडलीं आहेत. आणि त्यामुळे दोहोंच्या विनोदांत आपल्याला 'अशिष्ट' आणि 'शिष्ट' असा फरक दिसत आहे. अत्रे ह्यांच्यासारखें संपूर्ण विनोदी नाटक गडकरी ह्यांनी लिहिलें असतें, तर त्यांनी प्रेक्षकांना हसतां हसतां रडायला लावलें असतें !

ह्यानंतर आपण रांगणेकर ह्यांच्या नाटकांतील विनोदाकडे पाहूं. त्यांनी गेल्या सहा सात वर्षांत रंगभूमीची सेवा केली असून ती बरीच गाजवली आहे. त्यांचीं बरीचशीं नाटकें 'Light comidy'च्या धर्तीवर आहेत. त्यामुळे त्यांच्या नाटकांतून दुःखाला आणि हास्याला प्राधान्य नाही. त्यांच्या खेळकर आणि सहजसुलभ संवादांतून विनोद आपल्याला दिसतो. 'कुलवधू' मधील भानुमतीची मुलाखत घेण्यास आलेल्या जाहिरातवाल्याचा संवाद जरी विनोद निर्माण करणारा असला, तरी तो कथानकाशीं संबंध नसल्याने अनाठायी, अतएव, नाटकाला बाधक झाला आहे. 'कन्यादान' मधील संवादांतून निर्माण होणाऱ्या खटक्यांनी प्रेक्षकांना आनंद होतो. 'माझें घर' नाटकांतील प्रो. शहाणे ह्यांच्या बहिरेपणावर विनोद निर्माण केला आहे. तो विनोद 'इंदू-बिंदू' इतका बोचक नसला, तरी शारीरिक व्यंगावर आधारलेला असल्याने कटुहास्य (unfriendly laughter) निर्माण करणारा आहे.

नाटकांतून कांही प्रसंग असे असतात की, त्या ठिकाणीं कोणतेंहि पात्र कांहीहि बोलत नसतें, पण प्रेक्षक मात्र हसत असतात. 'साष्टांग नमस्कार' नाटकाला आरंभ, सिद्धेश्वर, शोभना आणि मीरा ह्या स्टेजवर साष्टांग नमस्कार घालीत असतांना होतो. त्यावेळीं पडदा उघडल्याबरोबर प्रेक्षक हसायला लागतात. त्याचप्रमाणे, 'कुलवधू'- मध्ये देवदत्ताच्या घरीं भानुमतीसारख्या सिनेमासम्राज्ञीच्या उत्कृष्ट सजविलेल्या दिवाणखान्यांत कोकणांतून आलेली त्याची आई, वडील आणि बहीण, त्यांचा तो जुन्या पद्धतीचा पोषाख, मोडक्या लोखंडी ट्रंकेला बांधलेली नारळाची दोरी आणि तो सर्व सामान 'सोफ्या' वर टेवून त्याची आई मात्र जेव्हा खाली जमिनीवर बसते, त्यावेळीं प्रेक्षकांना हसूं येतें. ह्या दोन्ही ठिकाणीं प्रेक्षकांना हसू येण्याचें कारण म्हणजे, त्यांच्या मनांतील ठराविक कल्पनेला विसंगत आणि प्रसंगाला विसंगत अशा गोष्टी त्यांच्या डोळ्यांसमोर घडत असतात. स्नान झाल्यानंतर देवापुढे बारा अगर जास्त साष्टांग नमस्कार घालण्याची अगर घातलेले पाहण्याची प्रेक्षकांना सवय असते. आणि, जेव्हा तो रंगभूमीवर साष्टांग नमस्कार घातलेले पाहतो, त्यावेळेस त्याच्या मूळ कल्पनेला अनपेक्षित धक्का बसल्यामुळे त्याला हसूं येतें. त्याचप्रमाणे, 'कुलवधू' मधील भानुमती ही सिनेमा नटी, तिचा पेहराव, आणि दिवाणखान्याची सजावट आणि तेथील वातावरण, याला अत्यंत विरोध निर्माण करणारीं कोकणचीं माणसें आलेलीं पाहून प्रेक्षकाला हसूं येतें. 'सोफ्या' वर नारळाच्या दोरीने बांधलेली मोडकी ट्रंक ठेवलेली पाहून तर प्रेक्षक फारच हसतो ! याला कारण म्हणजे त्या कोकणच्या मंडळींचें उत्कृष्ट फर्निचरने सजवलेल्या दिवाणखान्यांत कसें वागावयाचें, याचें अज्ञान आणि त्यापूर्वी कधींहि न पाहिलेल्या भपक्याला भाळल्यामुळे, आश्चर्याने कावरीबावरी झालेली त्यांची मनस्थिती होय.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गेल्या साठ–सत्तर वर्षांचा नाटकांतील विनोदाचा विकास मी आपल्यापुढे मांडला आहे. स्थलाच्या अभावीं बऱ्याचशा विनोदाला आणि नाटककारांना मला बगल द्यावी लागली, ह्याबद्दल वाईट वाटतें. वरील विवेचनावरून आणि विनोदी उदाहरणांवरून हें दिसून येईल की, विनोदाचा मक्ता स्त्रियांपेक्षा पुरुषांकडेच जास्त आहे. नाटकांतील स्त्रीपात्रें विनोदप्रधान दिसत नाहीत. त्यांचा उपयोग नाटककारांनी विनोदासाठीं निमित्तमात्र करून घेतला आहे. पण त्या प्रत्यक्ष विनोद निर्माण करीत नाहीत. चांगल्या वाईट विनोदाचा बराचसा मक्ता पुरुष पात्रांकडेच आहे.

कोल्हटकरांपर्यंत नाटकांत विनोदाला विशेष स्थान नव्हतें. त्यांच्या वेळेपासून नाट्यानुकूल विनोदाला प्रारंभ झाला. वर उल्लेखिलेल्या सर्वत्र नाटककारांनी, चांगल्यापैकीं विनोद निर्माण करण्याचा प्रयत्न आपापल्या नाटकांतून केला आहे. पण तो त्यांच्या नाटकांतील कथानकाला उपयुक्त असा फारसा आढळत नाही. बऱ्याच ठिकाणीं तो ठिगळ लावल्यासारखा वाटतो. विनोद–प्रधान अगर संपूर्ण विनोदी नाटक लिहिण्याचा पहिला मान माधवराव जोशी यांचा आहे. त्याचप्रमाणे, विनोदी स्वभाव–चित्रणें निर्माण करण्याचा पहिला मान शं. प. जोशी यांच्या 'खडाष्टक' नाटकांतील वक्रतुंड व कर्कशरावांचा आहे. पण तो उत्कृष्ट रीतीनें हाताळला आहे. अत्रे यांनी शं. मो. रानडे यांजपासून तों मो. ग. रांगणेकरांपर्यंत नाट्यांतील विनोदाची प्रगतीच झालेली आपल्याला दिसेल. विनोदाची विविधता, वैचित्र्य, खेळकरपणा सामाजिक, धार्मिक अगर राजकीय सुधारणेसाठी केलेला विनोदाचा उपयोग आपल्याला गेल्या तीस वर्षांतील नाटकांतून जास्त झालेला दिसतो.

नाटकांत जो विनोद–(१) कथानकाला अनुकूल म्हणजे त्या त्या नाटकांतील कथानकाला उपयुक्त, गती देणारा आहे तो, (२) अगर जो नाटकांतील त्या त्या प्रसंगाला अनुकूल आहे–म्हणजे त्या त्या प्रसंगाशीं एकनिष्ठ असून तो त्या प्रसंगाला अधिक खुलविणारा आहे तो, (३) अगर जो पात्रानुकूल आहे, म्हणजे त्या त्या पात्राच्या स्वभावरेखनाला उपकारक असा आहे–तो विनोद नाट्यानुकूल आहे, असें म्हणण्यास हरकत नाही. आणि, असल्या विनोदानें नाटकाला जास्त रंग भरतो. उदा. संशयकल्लोळ, मानापमान, म्युनिसिपालटी, साष्टांग नमस्कार, वंदेमातरम्. आणि, जो विनोद वरील तीन गोष्टींत बसत नाही, तो विनोद नाट्यानुकूल नाही, असें समजावें. अगदी आरंभीं, विदुषकी थाटाचा अगर अश्लील, ग्राम्य, अतिशयोक्तीवर आधारलेला असा विनोद आपल्याला दिसतो. आता विनोदाचे अनेक पैलू आपल्याला नाटकांतून दिसत आहेत. आजपर्यंतच्या नाटकांतील विनोदांचें बरेचसें स्थान कोट्यांनी घेतलें आहे. नाट्यानुकूल विनोद मात्र पाहिजे तितका दिसत नाही. तो ज्या दिवशीं दिसेल, तो दिवस नाट्यांतील विनोदाच्या भाग्याचा दिवस होईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन मित्र

एका रशियन लघुकथेचा स्वैर अनुवाद

अनु.—मधु जुननकर.

ते दोघेहि प्राणी संग्रहालयाजवळ ट्रामधून उतरले. साशा एका सहामजली इमारतीसमोर थांबला— “"हो ! हीच ती जागा !” ते दोघेहि जिन्यावरून सहा मजले चढून वर गेले. दारावरील घंटी वाजवतांच एका साधारण लठ्ठशा मुलीनं दार उघडलें, त्या मुलीनं त्यांच्याकडे आश्चर्याने बघत विचारलं, कोण हवयं तुम्हाला ? ”

साशा आपल्या मनांतील गोंधळ चेहऱ्यावर दिसूं नये म्हणून हळूच खाकरला नि म्हणाला “ नमस्ते तास्या ” त्या मुलीनं भुवयी उंचावून त्यांच्याकडे बघत विचारलं, “ कोण तुम्ही ?” इतक्यांत आर्केडींनं साशाला हळूच विचारले, “ कारे ! चूक तर नाही ना झाली ?” “ नाही रे बाबा ! हीच ती !-” साशा उत्तरला. ती मुलगी त्या दोन शिपाईगड्यांकडे गोंधळून आळीपाळीनं बघूं लागली. आर्केडी पुढे होऊन म्हणाला, “ तुम्ही तास्या !” होय ना ?— आणि हा साशा. बघा. याला तुम्ही ओळखतां ? बघा ! – आणि, साशाच्या तुमच्या ओळखीविषयीं सांगायचं, तर तुमचं वर्णन ऐकून-ऐकून माझे कान किटले आहेत. पण आता कळलं मला खरं काय तें ! पण आता असं व्हरांड्यांत आपण किती वेळ उभं राहणार ? खरं म्हणजे तुम्हाला भेटायचं या उद्देशानंच आम्ही युद्ध आघाडीवरून इथपर्यंत धडपडत आलों.” तास्या हसली “अच्छा ! तुम्ही आलाच आहां, तर या आंत ! ”

ते निळसर दिव्याच्या प्रकाशांत बरेच आंत चालत गेले. साशानं लाजेनं मान खाली घातली. ती त्याला विसरली होती. त्याच्या जवळून तिकीट घेत-घेत तिनं त्याचे आभार मानले होते त्यावेळची तीं ट्रॅममधील पांच मिनिटं ! आणि ती उतरली त्यावेळीं तिनं एक गोड नेत्रकटाक्ष टाकला होता त्याच्याकडे ! आणि साशानं तिचं गडबडींत पडलेलं पोस्टकार्ड उचलून स्वत: पोष्टांत टाकलं होतं. पण त्यापूर्वी त्यावरील तिचा पत्ता नि फोन नंबर तोंडपाठ करून घेण्याची खबरदारी घेतली होती. तोच हा नंबर ! पण आता पुढे आर्केडी अन् ती गप्पा मारत-हसत-खिदळत चालली होती नि साशा त्यांच्या मागोमाग सावकाश चालला होता. साशा मनाशींच म्हणाला, “ खरंच, किती विसरभोळ्या असतात मुली ! ”

तास्याची खोली लहानशीच पण व्यवस्थित होती. भिंतीवर सुंदर चित्रें लावलेलीं होतीं. टेबलावर निरनिराळीं चित्रं, आराखडे ‘ बिनतारी संदेश यंत्रांविषयींचीं ’ पुस्तकं पडलीं होतीं. एक रूळ नि इतर ड्रॉईंगचं साहित्यहि होतं.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

("बुद्धिवादी मुलगी हं!" —हळूच आर्केडी म्हणाला.) फक्त त्या नीटस खोलीला थोडंसं गालबोट लागलं होतं—काचेऐवजी लाकडी तावदानं खिडकीला लावलेलीं होतीं!

"आजच फुटलें तें! एक बॉम्ब प्राणीसंग्रहालयांत अगदी जवळच पडला! एक हत्ती मेला म्हणतात तिथला!—" तास्यानं खुलासा केला.

आजूबाजूनं दारांची उघडझाप, लहान मुलांच्या दुडदुड धावण्याचे आवाज, भांड्यांची खडखड–वगैरे सर्व प्रकारचे आवाज येत होते. कोणी पियानोहि वाजवीत होता. आघाडीवर गेल्यापासून या घरगुती वातावरणाचा जवळ-जवळ विसरच पडला होता त्या दोघांनाहि. ते दोघंहि त्या वातावरणानं भारल्या गेले नि त्यांना बाईट वाटलं.

आर्केडीनं ते दुःखदायक विचार घालवून देण्यासाठीच की काय विचारलं, "पॅटॅगोनिया किंवा ऑस्ट्रेलियांतील सुखी आयुष्य सोडून त्या हत्तीला इकडे येण्याची खरंच कांही जरूर होती?" तास्यानं मोठ्या प्रयत्नानं दाबलेलं हसूं बाहेर फुटलंच. आर्केडीच्या त्या मजेदार बोलण्यानं पोट धरून ती हसूं लागली. विजेच्या शेगडीवर तीन ब्रेडचे तुकडे गरम करून तिनं टेबलावर ठेवले. थोडा वेळ विचार करून मग एक साखरेची वडीहि तिनं ठेवली. नंतर तिनं टेबलाकडे अभिमानानं पाहिलं. आपल्या पाहुण्यांचं आपण योग्य आदरातिथ्य करीत आहों, या विचाराचं समाधान तिच्या चेहऱ्यावर झळकत होतं.

'वा! अगदी राजशाही थाट झाला!" आर्केडी म्हणाला. "हं, करा सुरवात" तास्या म्हणाली, " नुकतेच आघाडीवरून परतला आहांत तुम्ही. जरा लठ्ठ व्हायला हवंय तुम्ही लोकांनी!'

('मायाळू दिसते मुलगी'—आर्केडी मनांत म्हणाला.)

त्यानं साशाला हळूच खूण केली, अन् मग साशा नि आर्केडी आपल्या 'जंगी' खिशांतून तयार अन्नाचे सीलबंद डबे, रुपेरी कागदांत गुंडाळलेल्या 'चीज'च्या वड्या, आणि आणखीहि इतर बरेच खाद्यपदार्थ भराभर काढूं लागले. तास्या तर थक्कच झाली तें सर्व बघून. "वा छान" ती म्हणाली. खाणं चालू असतांना आर्केडी सारखा बडबडत होता. त्यानं साशाच्या कित्येक गंमती तिला सांगितल्या. पण यावेळीं तो नेहमीसारखी साशाची टिंगल उडवीत नव्हता. तर सर्व कांही अगदी गंभीरपणें सांगत होता तो! साशाच्या शौर्य, औदार्य, हुशारी—यांविषयीं सगळं कांही तिला सांगत होता.

परंतु या सर्व गोष्टींच्या नायकापेक्षाहि त्याच्या निवेदकाकडेच तिचं जास्त लक्ष वेधलं. आर्केडीच्या त्या कोट्या, गंमतीनं गोष्टी सांगण्याची त्याची ती पद्धत, त्याच्या लहानशा मिशीची टोकं, त्याचे काळ्या समुद्राजवळील भागाकडचे उच्चार या सर्व गोष्टी जणु तिला मोहिनी घालीत होत्या. तिला असल्या प्रकारचा माणूस कधींच भेटला नव्हता. आर्केडीनं चालवलेलं साशाचं गुणवर्णन मोठ्या उत्सुकतेनं ऐकत होती ती. पण त्याच वेळीं चॉकलेटच्या वड्या नि इतर खाद्यपदार्थ तोंडांत भरायचं मात्र ती विसरत नव्हती. गप्पा नि खाणं दोन्ही रंगांत आलं होतं. इतक्यांत
 एकदम ध्वनिक्षेपकांतून आवाज आला. तास्या गोंधळली.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" नागरिक हो ! 'हवाई हल्ला !–हुशार !' ध्वनिक्षेपकांतून हळू हळू एकेक शब्द स्पष्टपणें बाहेर पडत होता.

" अरे बापरे ! ही दहावी पाळी आजची ! काय मेला दिवस निघाला आहे ! " तास्या उद्गारली. लगेच ती लगबगीनं दरवाजाकडे निघाली.

" का हो कुठे निघाला इतक्या लगबगीनं ? "

आर्केडीनं विचारलं.

" शेल्टरकडे ! "

" अहो, कशाला उगीच ! "

" विसरला वाटतं आपण सहाव्या मजल्यावर आहों तें ! "

" मग तर अगदीच धोका नाही ! "

" ही गंमत करायची वेळ नाही ! "

" मी गंमत नाही करीत. अगदी खरं सांगतों. बॉम्बस् अगदी खालच्या मजल्याला फुटतात नि केक कापतात किनई, तसे अगदी ते पहिले पाच मजले कापून काढतात. अगदी शपथेवर सांगतों मी. मी मोठा हुशार नाही, पण बॉम्ब्स्-विषयीं मात्र मला पूर्ण माहिती आहे. अरे, बाबा, साशा ! तू तरी सांग या मुलीला कांही तरी, अगदी नवरदेवासारखा नको बसू ! "

ही गंमत करीत असतांनाच आर्केडीनं तास्याचा हात धरला. तास्या हसली. तिला जरा बरं वाटलं. पण तिकडे होणाऱ्या प्रत्येक तोफेच्या आवाजाबरोबर तिची घाबरगुंडी उडत होती !

हात तसाच त्याच्या हातांत राहूं देत तास्या म्हणाली, " इथे जवळच एक म्हातारा राहतो. तो शेल्टरकडे कधींच जात नाही. तो गणिताचा प्रोफेसर आहे. त्यानं गणित केलं आहे—लेनिनग्राड शंभर स्क्वेअर किलोमीटर्स आहे. आपलं शरीर किती जागा व्यापतं, हेंहि त्यानं मोजून काढलं ! शेवटी त्याच्या 'थिअरी ऑफ् प्रॉबेबिलिटीज्' ला अनुसरून त्यानं सिद्धांत काढला की, दहा लाख बॉम्बस् मधून फक्त एकच बॉम्ब आपल्या अंगावर पडण्याचा संभव आहे ! म्हणून तो कधींच शेल्टरकडे जात नाही. "

" जोरदार दिसतो म्हातारा ! " आर्केडी म्हणाला.

तितक्यांत खूप मोठा आवाज होऊन सर्व इमारत हादरली. " नाही, नाही ! " तास्या ओरडली, " आता नाही थांबवत मला इथं " ती शेल्टरकडे पळाली.

" अच्छा ! मग भेटूंच आम्ही ! " आर्केडी ओरडला.

शेल्टरमध्ये खूप गर्दी होती. कांही जण बाकावर झोपले होते, तर कांही खालीच आडवे झाले होते. दोन माणसं नि एक मुलगी पेंगत-पेंगत पत्ते कुटीत होतीं. कोपऱ्यांत एक मूल आपल्या आईच्या मांडीवर रडत होतं. त्या सर्व भाऊ-गर्दीतून एक म्हातारा अगदी काळजीनं वाट काढीत होता.

" प्रोफेसर ! " तास्या आश्चर्यानं म्हणाली, " तुम्ही इथं ? मला वाटलं की, तुमच्या 'थिअरी ऑफ प्रॉबेबिलिटीज' प्रमाणे—"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

म्हातारा हसत हसत उत्तरला, " हो ! पण खरी गोष्ट अशी आहे की, या सगळ्या लेनिनग्राड शहरांत एक मोठा हत्ती होता म्हणतात नि तो एका बॉम्ब स्फोटानं खतम झाला ! मग, पोरी, माझ्या 'थिअरी'ची अशी गत झाली आहे ! " म्हाताऱ्यानं निराशेनं हात हालविला नि तो निघून गेला.

आर्केडी, साशा आणि तास्या एका कोपऱ्यांत शिरले. तिथे एक बाक रिकामा पडला होता. तास्या त्या बाकावर जाऊन बसली. आर्केडी हुकमी आवाजांत म्हणाला, " साशा ! बैस तिथे ! " तास्यानं आर्केडीच्या शर्टाला हिसका मारीत म्हटलं, " तूंच बैस ! " आर्केडी नि तास्या जवळ जवळ बसलीं नि थोड्याच वेळांत गप्पा आणि हास्य–विनोदांत इतकी रंगून गेलीं की, जणु बॉम्बहल्ला--वगैरे त्यांच्या गांवींच नाही ! आडदांड साशा बाजूलाच उभा होता. तो थोडावेळ तिथं थांबला. मग त्यानं एक दीर्घ निःश्वास टाकला. थोड्या वेळानं तो बाहेर आला.

आकाश अगदी निरभ्र होतं. सर्चलाइटस्चे झोत गरगर आकाशांत फिरत होते. जवळच एका इमारतीला आग लागली होती. आणि, भिंत अगदी तांबडी लाल दिसत होती साशाला मोकळ्या हवेनं जरा बरं वाटलं. त्यानं आपली सिगारेट पेटविली. ॲस्बेस्टॉसच्या कपड्यांत ' ए. आर. पी. ' चे लोक फिरत होते. इतक्यांत एका विमानाचा आवाज अगदी स्पष्टपणें येऊं लागला. साशानं डोळे आकुंचित करून नि कान टवकारून त्या दिशेकडे पाह्यलं.

" अरे, हे तर जंकर्स ऽ ऽ " इतक्यांत छप्परावर कांही तरी पडल्याचा आवाज झाला.

" सूर मारली लेकानं ! मशीनगन सुरू केली " कोणी तरी म्हणाला- " मशिनगन नाही बाबा ! " इन्सेन्डीअरीज टाकतो आहे लेकाचा "—असं म्हणत साशानं छप्परावर चढायला सुरवात केली. छपराला भयंकर आग लागली होती. त्याला एक लहानसा कठडा होता. साशानं त्याच्यावर पाय ठेवले नि तो आगीकडे निघाला. पडूं नये म्हणून त्यानं आपले पाय फाकले नि आपलं मजबूत शरीर थोडंसं पुढे झुकवलं. मधून--मधून छपराचा आधार घेण्यासाठी त्यावर हातहि टेकवीत होता तो. शेवटी तो ऐन आग लागलेल्या जागेवर पोचला. दोन मुलं तिथं वाळू टाकून आग विझविण्याचा प्रयत्न करीत होती. एका जवळून वाळूची पिशवी घेत साशा म्हणाला, " बघूं ! मी लवकर विझवूं शकेन आग ! " आणि खरोखरच त्यानं भराभर वाळू टाकून आग आटोक्यांत आणली. लगेच तो दुसरीकडे वळला. इथे तर आग खूपच भडकली होती ! छपराखालची लोखंडी तुळई साफ जळली होती ! आणि, खालच्या लाकडांना ज्वाळा भिडल्या होत्या. एक वयस्क बाई तिथे पाण्यानं आग विझविण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत होती. छपराला पडलेलं भगदाड प्रत्येक क्षणाला वाढत होतं. एक लोखंडी तुळई तर अगदी उघडी पडली होती नि आग धुमसत होती !

" आता ती एका क्षणांत खाली जाईल ! " ती स्त्री ओरडली.

साशानं तिचं ॲस्बेस्टॉस--कव्हर टरकन् फाडलं नि आपल्या हातावर गुंडाळलं. आणि, त्यानं आपले हात त्या लालभडक जळत्या तुळईखाली घातले. आणि, ' हूं ' म्हणून त्यानं जोर लावला. त्यासरशी ती लाकडी तुळई कडकड करीत मोडली. साशानं लगेच ती उभी केली आणि धाडकन् खाली रस्त्यावर फेकली. ती स्त्री

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साशाकडे भीतीयुक्त आदरानं बघत होती. 'परऱ्यांच्या गोष्टी'मधील एखाद्या नायका-सारखा वाटला तिला तो. लगेच छपरावरून पलिकडे गेला तो. नंतर त्यानं कित्येक आगी विझवल्या. बऱ्याच वेळानं तो खाली गेला. नळावर हातपाय, तोंड धुवून त्यानं केस विंचरले.

इतक्यांत कांही 'ए. आर. पी.' चीं मुलं त्याच्याकडे आलीं नि त्याला नांव विचारूं लागलीं.

"माझं नांव ! कशाला ?"

"म्हणजे आम्ही तुझे अधिकृत रीत्या आभार मानूं,"

"मुलांनो ! आता नको, मग केव्हां तरी बघूं !" असं म्हणून साशा शेल्टरकडे सटकला. सर्वजण झोपले होते. फक्त तास्या नि आर्केडी तिथं बसलेले होते.

"कुठं गेला होतास ?" आर्केडीनें सहज त्याला विचारलं.

"जरा बाहेर फिरून आलों."

"ओ हो !" असं म्हणून आर्केडी पुन: तास्याकडे वळला. इतक्यांत 'सब ठीक' चा भोंगा झाला. तिघेंहि पुन: तास्याच्या खोलीकडे गेलीं. आर्केडी तास्याचा निरोप घेत होता. इतक्यांत साशानं टेबलवरील तिचा फोटो खिशांत दाबला !

जवळ--जवळ मध्यरात्रीं ते दोघेहि 'आर्मी डेपों' त पोचले, तेथे मोटार तयारच होती. त्यांची मोटार निघाली, तेव्हा त्या गडद अंधारांतून दूरवर आगीचें लोळ अगदी स्पष्टपणें दिसत होते. बंदुकांची धडधड चालूंच होती. मोटारमध्ये मागच्या भागांत ठेवलेल्या दारुगोळ्यांच्या पेट्यावर साशा अन् आर्केडी आडवे झाले. मोटार त्या अरुंद, नागमोडी रस्त्यावरून हळूहळू जात होती. साशा हळूंच आर्कडीला म्हणाला, "शेवटी तूंच तिच्या प्रेमांत पडलास ना !"

"कोण ? तुझ्या तास्याच्या ? छे मला नाही आवडत तसली मुलगी !"

थोडावेळ थांबून साशा पुन: म्हणाला, "अन् ती तुझ्या प्रेमांत ?"

"माझ्या ? माफ कर !"

पण आर्केडीला स्वत:चं मन खात होतं. ओडेसाकडील रीतीरिवाजांना दुसऱ्याच्या प्रियेचं अपहरण संमत नव्हतं. आर्केडीला वाटलं, साशाला आपण खरोखरच दुखवलं. म्हणून त्याचं सांत्वन करण्याचा तो प्रयत्न करूं लागला.

"दोस्त ! तिचं तुझ्यावर इतकं प्रेम आहे की, विचारूं नको" आर्केडी म्हणाला, "सारखी तुझ्याविषयीं विचारत होती. हा कोण आहे ?—कसा आहे ? हज्जार प्रश्न विचारून भंडावून सोडलं पोरीनं !"

"चल, चल ! पुरे झाला तुझा पोरकटपणा !" साशा संशयी नजरेनं त्याच्याकडे बघत म्हणाला.

"खरं सांगतों. गंमत नाही ही," आर्केडी म्हणाला, "तूं आहेस अत्यंत देखणा. तुझ्यासारखा मुलगा आपल्या साऱ्या तुकडींत नाही."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" मी ! अन् देखणा ? " साशानं त्याच्या म्हणण्याला थोडासा विरोध केला. पण आर्केडी सारखा बोलतच होता. स्वत:च्या प्रियेविषयीं इतका थंडपणा दाखवावा, याबद्दल साशाला त्यानं दोष दिला. त्यानं साशाच्या प्रेमाचा, जणु कांहीं, आपल्याला हेवा वाटतो, असं ढोंग केलं. आणि, शपथेवर सांगितलं की, साशाबरोबर आता पुन्हा कधी जाणार नाही म्हणून ! (" पुन्हा आलों, तर माझ्यासारखा मूर्ख मीच ! अरे तूं तिच्याशीं एक अक्षर देखील बोलत नाहीस ! ")

अशा रीतीनं आर्केडीनं त्याच्या मनांतील दु:खाला नि संशयाला दूर केलं. साशा खुलला, तरी पण त्याला लाज वाटत होती. तूं काय म्हणतोस, तें मी नाकबूल नाही करूं शकत ! खरंच आर्केडी, तिच्यासारखी एखादीच मुलगी असेल या जगांत. या लढाईमुळेच आमची भेट होऊं शकली. नाही का ? "–साशा म्हणाला.

आता समुद्रावरील वारा अंगाला झोंबत होता. उजवीकडे फिनलंडचं आखात पसरलं होतं. लेनिनग्राडचा बचाव करण्यासाठी तेथून अविरत अग्निवर्षाव चालू होता. जिकडे तिकडे काळोख पसरला होता. आणि, साशा पुन: हळूहळू बोलूं लागला. जणु अंधारामुळे त्याला धिटाई आली होती !

" माझं तिच्यावर किती प्रेम आहे ! कुण्णा-कुण्णाला सांगणार नाही हें मी ! तिला देखील नाही ! फक्त तुलाच सांगतों, आर्केडी ! प्रथमदर्शनीं प्रेम ! असलं प्रेम आज कुणीहि कुणावर करूं शकणार नाही ! खरंच सांगूं तुला ? माझं केवढं प्रेम आहे तें ? तूं जसा मला प्राणाहून प्रिय आहेस ना, अगदी तश्शीच ती ! खरंच, पण मला कांहीच कल्पना नाही तिचं माझ्यावर कसं प्रेम बसलं या बाबतींत ! आर्केडी, तिनं या बाबतींत तुला नक्कीच सांगितलं असेल. इतका वेळ बोलत होतां तुम्ही ! खरं सांग, तिला माझ्याविषयीं असं कसं वाटायला लागलं ? ए, आर्केडी, सांग रे ! ए लेका, आर्केडी, उत्तर का नाही देत ? " साशानं त्याच्या तोंडाजवळ तोंड नेऊन अगदी निरखून पाह्यलं. आर्केडी त्या बॉम्बस्च्या पेटीवर डोकं ठेवून स्वस्थ झोपला होता. साशानं लांब उसासा टाकला !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातीचे छन्द

वि. ज. सहस्रबुद्धे

मराठींतील कांही छंद कांही जातींपासून निघालेले आहेत, असा एक अत्यंत महत्त्वाचा शोध कै. डॉ. माधवराव पटवर्धन यांनी 'छंदोरचने'त लावलेला आहे. हा शोध चुकीचा असल्याचें या लेखांत मिरजचे रा. तात्याबुवा सहस्रबुद्धे यांनी दाखविलें आहे.

छंदःशास्त्रांतील या अतिशय महत्त्वाच्या मुद्यावर साधक-बाधक चर्चा होणें अवश्य आहे.

*

माझ्या 'पद्य-मीमांसा' पुस्तकावर परीक्षणें प्रसिद्ध झालीं, त्यांपैकी एका परीक्षण-लेखांत 'जाती'चे छन्द कसे होतात, याविषयीं माझी समजूत घालण्याकरता त्या परीक्षण-लेखकाने मुद्दाम थोडी चर्चा केली होती. मी खरोखरच त्याबद्दल विचार केला नव्हता, म्हणून तेव्हापासून आतापावेतों सवडीनुसार अनेक रीतीने विचार करून पाहिला. त्या विचाराअन्तीं माझें झालेलें मत व त्याचीं कारणें या लेखाच्या द्वारें सर्वांपुढे ठेवीत आहें.

'जाती'चे छन्द होतात, याबद्दलची माहिती मिळविण्यासाठीं थोडा पत्र-व्यवहार केला व खुद्द प्रा. माधवराव पटवर्धन यांच्या 'छन्दोरचने'तील त्यांचें म्हणणें पाहिलें. मी ज्यांच्याकडे पत्रें लिहिलीं होतीं, ते गृहस्थ माधवराव यांच्याशीं सहमत आहेत. या बाबतींत मी बराचसा प्रतिकूलच आहे. कांही थोडी अनुकूलता संभवते. ती कोणत्या बाबतीपुरती आहे व कशी आहे, यांबद्दल जरूर तो खुलासा पुढील विवेचनांत येणारच आहे.

१ सर्व 'जाती'चे छन्द होत नाहीत. ज्या 'जातीं'त दोन्हींने भाग जाणाऱ्या मात्रा-संख्येचीं आवर्तनें असतात, तेवढ्याच जातीचे छन्द होतात, अशी उपपत्ति सांगण्यांत आलेली आहे.

यावर माझा मुख्य आक्षेप आहे, तो हा की, छन्दाचा 'जाती'शीं संबंध जोडण्याची मूलतःच आवश्यकता नाहीं. कारण ज्या जातीचा छन्द समजावयाचा आहे, तो छन्द त्या जातीच्या चालीवर गावयाचा नाही, अगर म्हणावयाचा नाही.

उदाहरणार्थ पहा:—

'हरिभगिनी' जाति. चरणांत मात्रा तीस.

हरिची भगिनी, म्हणे सुभद्रा, रुक्मिणि वहिनी, दया करा।
दादाना तुम्हि, कळवुनि वळवुनि, अर्जुनजीचा, शोध करा ॥ १ ॥

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याचा 'हरिभगिनी' छन्द. चरणांत अक्षरें पंधरा.
ईश्वराची दया किती थांग तिचा लागेना ॥
न्यायी तरी त्याची प्रीति सिंधु एवढी जाणा ॥ १ ॥

वरील हरिभगिनी छन्द, हरिभगिनी 'जाती' च्या चालीवर म्हणावयाचा नाही व म्हणतां येणार नाही. तेव्हा 'हरिभगिनी' या 'जाती' शीं 'हरिभगिनी' छन्दाचें नातें का जोडण्यांत आलें आहे, हेंच मुळी कळत नाही. " जातींतील मात्रा–संख्येची निमपट अक्षर " येवढें गणीत सांगून संबंध जोडणें अशास्त्रीय आहे. त्याला तात्त्विक कारण कांहींच दाखविलें नाही. 'हरिभगिनी' जाति 'सताल' आहे, तसा 'हरिभगिनी' छन्द 'सताल' होऊं शकणार नाही, कारण, हरिभगिनी छन्दांतील प्रत्येक अक्षराचा उच्चार द्विमात्रिक करावयाचा म्हणून ठरविण्यांत आलेलें आहे.

दुसरी शंका अशी:—

चरणांत तीस मात्रा असणारी मात्रावृत्तें म्हणजे 'जाति' १ हरिभगिनी, २ भवानी, ३ गीति, याप्रमाणें तीन आहेत. त्यापैकीं हरिभगिनी हेंच नांव निवडण्याचें कारण काय आहे, याचा सयुक्तिक खुलासा झालेला नाही.

तसेंच, प्रत्येक चरणांत अठ्ठावीस मात्रा असणारी मात्रावृत्तें १ लवंगलता, २ अरुणप्रभा, शुक्रकला. या प्रमाणें तीन असून त्यांतील 'लवंगलता' हेंच नांव चौदा अक्षरी छन्दाला देण्यांत आलेलें आहे, त्याचें कारणहि वरील हरिभगिनी छन्दाप्रमाणेंच समजून येत नाही.

३ तिसरी शंका:—

'पादाकुलक' छन्द, अक्षरें आठ.

उदाहरण—

कान्हा वाटे देव भेटे ॥
हातीं पायीं तोच दाटे ॥ १ ॥

'देवीवर' छन्द, अक्षरें आठच आहेत.

उदाहरण—

रूप पाहतां लोचनीं ॥
सुख झालें वो साजणी ॥ २ ॥

याप्रमाणें अक्षर—संख्येच्या दृष्टीने वरील दोन्ही पद्याच्या प्रत्येक चरणांत सारखीं म्हणजे आठ आठ अक्षरें असतां एकाचें नांव 'पादाकुलक' व दुसऱ्याचें नांव 'देवीवर' अशी नांवाची भिन्नता करण्यामध्ये कोणतें शास्त्रीय तत्त्व सांभाळलें आहे, याचा बोध होऊं शकत नाही, आणखी पहा.—

१ 'उद्धव' छन्द, २ 'अचलगति' छन्द, ३ 'भुवन सुंदर'- छन्द, हे तीनही छन्द अक्षर—संख्येच्या दृष्टीने समान म्हणजे सात अक्षरी असून तीन निरनिराळीं नांवें का दिलीं कोण जाणे !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील दोन्ही तऱ्हांवरून नांव देण्याची पद्धत एक नाही, ही महत्त्वाची गोष्ट आढळून येते.

असो, इतर रीतीने अधिक विचार करूं.

४ दिण्डीचा छन्द होत नाही. का? तर दिण्डीतील चरणाच्या मात्रा एकोणीस आहेत व त्या एकोणीस संख्येस दोहोंने भाग जात नाही, हें त्याचें कारण होय. उलट पक्षीं, दोन या संख्येने भाग जाणाऱ्या मात्रा संख्येच्या सर्व जातींचे छन्द होण्यास गणित-दृष्टीने हरकत नसावी. परंतु सर्व जातींचे छन्द होत नाहीत, असें पुन्हा म्हणणें आहेच. बरें, हरकत आहे, तर असो एकवेळ! पण हरकत कां येऊं शकते, याचें कारण तरी समजणें जरूर आहे.

'चंद्रकान्त' जातीचें उदाहरण घेऊन मी एका गृहस्थाला विचारलें होतें की, 'चंद्रकान्त शिथिल जाति' म्हणजेच 'चंद्रकान्त छन्द' समजतां येईल काय? त्यावर उत्तर आलें आहे तें असें:—

"चंद्रकान्त शिथिल जाति व चंद्रकान्त छन्द यामध्ये निश्चित भेद आहे. छन्दांत तेरा अक्षरें (म्हणजे मात्रा सव्वीस) असतात, पण शिथिल जातींत तेराच अक्षरें असतील, असा नियम नाही. म्हणून तीं दोन्ही एक नव्हेत. चंद्रकान्त जाति व चंद्रकान्त छन्द यांच्या चाली भिन्न आहेत. छन्दामध्ये प्रत्येक अक्षराचा द्विमात्रिक उच्चार करावयाचा असतो पण शुद्ध जातीमध्ये अथवा शिथिल जातीमध्यें प्रत्येक अक्षराचा द्विमात्रिक उच्चार करावयाचा नसतो. याप्रमाणे त्या उत्तरांतील आशय आहे.

५ छन्दाचीं उदाहरणें म्हणून जी प्राचीन पदें दिलीं आहेत, त्यावरून शिथिल जातीलाच (शिथिल मात्रा-वृत्ताला) छन्द म्हणण्यांत आलें आहे, असा संशय घेण्यास आधार मिळतो. सबब त्याचा खुलासा येथे देतों.

'लवंगलता' छन्दाचें उदाहरण म्हणून

|| येई गा तूं येई गा तूं पंढरीच्या राया ||
|| तुजवीण शीण वाटे क्षीण झाली काया || १ ||

हें तुकाराम कृत-पद-संग्रहांतील पद उध्दृत केलें आहे. तसेंच 'चंद्रकान्त' छन्दाचें उदाहरण म्हणून

	भज रे मना रे बारे भज रे मना	
	रामकृष्ण वासुदेव भज रे मना	
	आता काय नर-देह येईल पुना || १	

हें प्राचीन पद दिलें आहे ('छन्दो रचना,' पान ५१८।५१९)

माझ्यामतें, वरील दोन्ही पदें शिथिल मात्रा वृत्तें दिसतात. त्यांवर छन्दाचा आरोप केवळ अक्षरसंख्या मोजून पाहून करण्यांत आलेला आहे, तो चूक वाटतो. सदर दोन्ही पदांच्या चालींचा नीट विचार केला व तीं पदें म्हणण्याची पूर्वपरंपरा काय आहे, हें समजून घेतलें, तर 'शिथिलजाति' किंवा 'छन्द' यासंबंधीं निर्णय करण्यास साधन मिळूं शकेल, असें वाटतें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुलने करता 'आरती' चें उदाहरण सांगतां येईल. 'आरती' हा छन्द किंवा मात्रावृत्त (जाति) याबद्दल अजून कित्येकांना शंकाच आहे. खरें म्हटलें, तर आरतीच्या चरणांतील अक्षरसंख्या पाहून त्यावरून तिचें लक्षण बांधणें चूक आहे. त्याचप्रमाणे वरील दोन्ही पदांच्या बाबतीमध्ये अक्षरसंख्येवरून अनुमान काढल्याने चूकभूल झालेली दिसून येते. 'परिलीना' छन्दाचीं उदाहरणें म्हणून ज्ञानेश्वर व केशवस्वामीकृत पदें दिलीं आहेत. ('छंदोरचना' पान ५२७) तीं पदें मुदा 'छन्द' नसून शिथिलमात्रावृत्तें आहेत.

६ जुन्या वाङ्मयांत अभंग, ओव्या, हेच दोन अक्षर छन्दाचे मुख्य प्रकार आहेत. इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'मराठी छन्द' म्हणून एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे, तींत मराठी छन्दाचे दहा प्रकार त्यांनीं दिले असले, तरी केवळ अक्षर संख्येवरून ज्याचें लक्षण ठरविण्याचे, असे प्रकार म्हणजे अभंग, ओवी व घनाक्षरी असे तीनच प्रकार होत. अक्षरछन्दांचीं जुनी नांवें अभंग व ओवी हीं असून त्या नांवाची परिभाषाच माधवराव पटवर्धन यांनीं सोडून दिली आहे, याचें आश्चर्य वाटतें. वास्तविक पूर्वीची परिभाषा बदलण्याचें मुळींच कारण नव्हतें व नाही. पूर्वीची परिभाषा रद्द करून नवीन परिभाषा प्रवर्तित करतांना पूर्वीच्या परिभाषेंतील दोष सांगून नवीन परिभाषेमुळे होणारी सोय अगर उपयुक्तता दाखवून देणें जरूरच होतें, पण या गोष्टीकडे माधवराव पटवर्धन यांनी दुर्लक्ष केलें आहे. शास्त्रीय पुस्तकांत अशा गोष्टींची चर्चा करावयाची नाहीं, तर कोठें करावयाची, असेंच कोणीहि विचारील.

अभंग व ओवी यांचे अनेक प्रकार संभवतात. तेव्हा प्रत्येक प्रकाराकरता निराळें नांव पाहिजे व ती अडचण दूर करण्यासाठीं माधवराव यांनी छन्दाचीं निरनिराळीं नांवें रूढ करण्याचा प्रयत्न केला, असें कोणी त्यांच्यातर्फे म्हणतील, परंतु त्याची सोय राजवाडे यांनी लावून दिलीच आहे. तीच गोष्ट आता पाहूं.

॥ आम्ही जाणावें तें काई ॥
॥ तुझें वर्म कोण्या ठायीं ॥
॥ अन्तपार नाही नाही ॥
॥ ऐसें श्रुति बोलती ॥ १ ॥

हा ज्ञानेश्वराचा अभंग आहे. याला 'अभंग' न म्हणतां माधवराव यांनीं 'श्यामाराणी' छन्द म्हटलेलें आहे. राजवाडे यांनी 'अभंग' ही परिभाषा कायम ठेवून पोटप्रकार दाखविण्यासाठी वरील अभंगास 'अनुष्टुप अभंग' असें संबोधिलें आहे.

॥ रूप पाहतां लोचनीं ॥
॥ सुख झालें वो साजणी ॥

या अभंगाला 'देवीवर' छन्द असें माधवराव म्हणतात आणि राजवाडे हे 'प्रतिष्ठा अभंग' म्हणून संबोधितात.

॥ देवाचियेद्वारीं । उभा क्षणभरी ।
॥ तेणें मुक्ति चारी । साधियेल्या ॥ १ ॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

याला 'देवद्वार' छन्द असें माधवराव हे म्हणत असून राजवाडे यांनी त्याला 'गायत्री' अभंग म्हणून म्हटलेलें आहे. त्यांनी उदाहरणादाखल—

॥ जगाच्या कल्याणा । संतांच्या विभुति ।
॥ देह कष्टवीती । उपकारें ॥ १ ॥

हा अभंग उध्दृत केला आहे.

याप्रमाणें अभंगाबद्दलचा खुलासा झाला. ओव्यांसंबंधीं थोडक्यांत विचार असा:—

माधवराव यांनी समाक्षरक ओव्यांचीं उदाहरणें व त्यांचीं नांवें दिलीं आहेत तींच येथे नमुन्याकरता घेऊं.

नाव 'देवद्वार' छन्द

ओवी

॥ अंगाईचे घरीं । मंगाई ग गेली ।
॥ सवंगाई झाली । दाणेयाची ॥ १ ॥

नांव 'तुळसी' छन्द

ओवी

॥ कावळा काका करी । घराच्या आढ्यावरी ।
॥ पाहुणा घोड्यावरी । भाऊराया ॥ १ ॥

नांव 'पुष्पगुच्छ' छन्द

ओवी

॥ फूल फूल घोसाळिये ।
॥ फूल गेले ग घोसांतं ।
॥ तुझें सासर देशांत ।
॥ अंबूबाई ॥ १ ॥

वरील ओव्या अनुक्रमें षडक्षरी, सप्ताक्षरी व अष्टाक्षरी आहेत. राजवाडे यांनी अशा ओव्यांना अक्षर संख्येवरून षडक्षरी, सप्ताक्षरी व अष्टाक्षरी असेंच म्हटलेलें आहे. माधवराव यांच्या परिभाषेप्रमाणे 'देवद्वार' या छन्दामध्ये षडक्षरी अभंग व षडक्षरी ओवी, असे दोन्ही प्रकार येऊं शकतात, म्हणजे अभंग ओवी यामध्ये कांहीच तात्त्विक भेद नाही, असेंच त्यांचें मत दिसतें. पण वस्तुत: अभंग व ओवी म्हणण्याच्या चाली भिन्न आहेत, अर्थात् माधवराव यांच्या नवीन परिभाषेमुळे बराच घोटाळा निर्माण होण्याचा संभव उत्पन्न झाला आहे.

एकंदरींत 'अभंग' व 'ओवी' ही परिभाषा सोडून देण्यामध्ये माधवराव यांनी तत्त्व व सोय यांपैकीं काय साधलें आहे, असा मोठाच प्रश्न येऊन पडतो.

मुख्य मुद्दा असा कीं, अमुक 'जाती' चा अमुक 'छन्द' आणि "जातींत जितक्या सशब्द मात्रा असतात, त्याच्या अदपट अक्षरें त्या छन्दांत असावयाचीं" ही उपपत्ति सांगण्यापासून शास्त्रीय दृष्टीने खरोखर कांही फायदा असल्याचें निष्पन्न होऊं शकत नाही, असेंच सिद्ध होत आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व छन्दाचा मात्रासंख्या व अक्षरसंख्या एवढ्या-
पुरताच प ार लिहिल्याप्रमाणे जातीचा आहे. जातीची चाल छन्दाला लावावयाची
नाही, अं क्त परस्पर संबंध जोडला लावणें (लावू म्हटल्यास) शक्यहि नसतांना
" जातींत र्ड ठरलें असतां व चाल येतो त्या ठिकाणीं छन्दांतहि यति पाळावयलाच
हवा " (ा जेथें अपरिहार्यपणें यति पडा) असें माधवराव यांनीं ठांसून का सांगितलें
आहे या छन्दोरचना पान ५१३ म्हणून ही शंकामुद्दा येथे विचारार्थ नमूद करून
ठेवणें अ चा बोध झाला नाही.
वश्य आहे. दाचा मुद्दा राहिला आहे, सबब त्याकडे वळतो.
ाता आणखी एक वा व यांनी खालील प्रमाणे दोष दिला आहे. ते म्हणतात
की, (राजवाडे यांना माधवरा ५६१)
' छन्दोरचना ' सार करतांना तो छंद लगत्व भेदातीत आहे हें ध्यानांत न
आल्या " घनाक्षरीच चन निष्कारण पाल्हाळीक आणि मूलतः सदोष झालें आहे."
घट राजवाडे यांचे अ राजवाडे यांच्यावर वरील आक्षेप घेण्यासारखी परिस्थितीच
नाही --वास्तविक प , मी णतांना अगर वाचतांना ती मधील प्रत्येक अक्षराचा उच्चार
द्विम वर आपलाक्षरी, नाही, ही गोष्ट कोणाच्याहि अनुभवाला येऊं शकेल. छन्द
म्हट ता दृष्टीच होत ('लगत्व भेदातीत' म्हणजे छन्दांतील प्रत्येक अक्षर 'गुरु' अशा प्रकारचा
अति हे सर्व विचा यमक मुळांत चूक आहे. राजवाडे यांनीं अभंग व ओवी म्हणण्याची
पद्ध शी आहे, याबद्दल खुलासा केलाच आहे. माधवराव हे मात्र एकदा
णें सरळ उच्चार वाचतां वाचतां ्याची चाल लागते तें पद्य
दृष्ट्या (छन्दोरचना ' पान १५) असें विधान करीत असून त्य क मद्याच्या उलट
" सारीं अक्षरें सारख्याच वेळांत उच्चारणें हें नेहमींच्या वहिवाटीहून वेगळें गांच आणि
म्हणून अस्वाभाविक असलें तरी तेवढ्या पुरतें तें आनंददायक होतें " (' छंदो रचना '
पान १७।१८) असें समर्थन करण्यास तयारच आहेत.

' छन्दोरचना ' ग्रंथांत जे निरनिराळे अनेक छन्द दिले आहेत, त्यांपैकी बहुतेक छन्द अभंग व ओवी या मध्येच समाविष्ट होणारे आहेत. त्यांतून जे अगदीं थोडे उरतील (उरणें शक्य आहे असें गृहीत धरून) त्यांना स्वतंत्र नांवें द्यावीत मात्र त्या छन्दाचा कोणत्याहि ' जाती 'शीं नसता संबंध जोडूं नये व " जातींतील मात्रासंख्येच्या निमपट अक्षरें " असलें गणितहि पण सांगू नये, असें मला वाटतें. उच्चाराच्या बाबतीत येवढेंच म्हणावयाचें कीं, व्याकरणादिकांनीं भाषेचें स्वरूप निश्चित किंवा नियमित झालें असून ' लगत्वभेद ' ठरला आहे, तेव्हा पद्य-प्रकार कोणताहि असो. अक्षरांचा उच्चार लगत्व भेदाच्या दृष्टीने स्वाभाविक म्हणजे जिव्हेला सहज ग्राह्य आणि कर्ण मधुर असावा. सुशिक्षित व सुसंस्कृत लोकांची उच्चार-पद्धति हीच आदर्श समजली जावी. लहान मुलें व प्राकृत अथवा अडाणी लोक यांच्या भाषेच्या उच्चारांतील शैथिल्य कांहीं प्रसंगीं गोड वाटलें, तरी छन्दः शास्त्राच्या विचारांत त्याला किती महत्त्व द्यावयाचें हें पहावयास नको काय ?

शेवटीं एक सूचना करावयाची आहे की अभंगादि छन्दांना नुसतें ' छन्द ' असें न म्हणतां त्यांस ' अक्षरछन्द ' असें म्हणावें. कारण छन्द हें सर्वच पद्य-प्रकाराला लागू होणारें व्यापक नांव आहे, तेव्हा ते छन्दाच्या एका पोट-भेदाला लावणें गैर ठरतें.

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यसमालोचन

संपादक

प्रकाशक—दि. मा. धुमाळ, नागपूर प्रकाशन
सीताबर्डी, नागपूर

१. हंसदूत (ले. प्रा. म. श्री. वैद्य; किं. रु. २।) महाभारतांतील दमयंती कथेवरून प्रा. वैद्य यांनी 'हंसदूत' व 'दमयंती' या 'चि[illegible] नल– लिहिलेल्या आहेत, या कथांना लेखक म्हणतात, तद्वत्, 'चित्रकथा' हा [illegible]कथा' भीतभीतच लावावयाचा आहे; कारण त्या काटेकोरप[illegible]गाने 'Scenario शब्दहि शकत नाहीत. "आपण लिहिलेलें पडद्यावर कसें दिसेल, [illegible] एकच एक [illegible] होऊं मनांत ठेवून या कथा लिहिण्यांत आल्या आहेत. अर्थात् हा [illegible] अभिनव लेखकार" आहे व त्या दृष्टीने प्रा. वैद्य यांचें या प्रयत्नाबद्दल अभिनंदन [illegible] करयास पाहिजे [illegible]

२. सखी (ले. वि. वि. बोकील; किं. रु. २। [illegible]सिद्ध क[illegible] रा. बोकील यांनी ही कादंबरी लिहिलेली आहे. स्त्री आर्थि[illegible] [illegible] स्वत[illegible] लेखक पाहिजे, अशी स्वतंत्र पत्नीच नवऱ्याची खराखुरी 'सखी' होऊं शकते, हा [illegible] झाली कादंबरीच्या द्वारा बोकील यांनी मांडलेला आहे. बोकीलांच्या लेखणी[illegible] या कादंबरींत प्रकर्षाने पहावयास मिळत नसला, तथापि ती एकवार वाचनीय या [illegible] हे.

३. सावलीच्या उन्हात (ले. श्रीराम अत्तरदे; किं. रु. ३.) भिल्ल–पावऱ्यांच्या प्रश्नावर [illegible] [illegible] कादंबरी लिहिलेली आ[illegible] ॥ १ ॥ [illegible]सल्यामुळे तिच्यांत नवीनपणा [illegible] [illegible]रलेला आहे व तेवढ्यापुरती ती आकर्षक वाटते. मात्र [illegible] ती यशस्वी झाली आहे, असें म्हणतां येत नाही.

४. जीवनप्रवाह (ले. द. ग. प्रधान; किं. रु. २॥) तीन विसंवादी जोडप्यांची जीवनकथा या कादंबरींत रा. प्रधान यांनी गुंफलेली आहे. भावना-प्रधान पात्रें निर्माण करून निदान त्यांच्या जीवनांत तरी भावनेला केवढें महत्त्व असतें, हें या कथेंत प्रधान यांनी दाखविलें आहे. कादंबरी बरी आहे.

५. गोल देऊळ (ले. स. ना. सूर्यवंशी; किं. रु. ३) मुंबईच्या पायरस्त्यावर जीवन कंठणाऱ्या हीन दीन लोकांच्या आयुष्याच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी लिहि-लेली असल्याने व तींत लेखकाचा जिव्हाळा उमटला असल्याने तिला एक प्रकारचें नाविन्य प्राप्त झालें आहे. मात्र लेखकाने सुंद्रीला बोलपट-सृष्टींत का नेलें हें कळत नाही ! सूर्यवंशी यांची ही कादंबरी त्यांच्या विषयी आशा निर्माण करणारी आहे.

६. तिसरें जग (ले. शरचंद्र टोंगो; किं. ॥=) प्रसिद्ध तरुण कादंबरीकार रा. टोंगो यांनी हें चिमुकलें नाटक लिहिलेलें आहे. काव्यमय वातावरण व सुटसुटीत संवाद यांमुळे तें सुंदर वाटतें.

७. इंदिरा (ले. प्रा. लीला देशमुख; किं. रु. २॥।) प्रा. लीला देशमुख या कथालेखिका म्हणून महाराष्ट्रास परिचितच आहेत. त्यांच्या कांही स्वतंत्र व अनुवा-दित लघुकथा या पुस्तकांत दिलेल्या आहेत. "भावीचं माहेर" ही स्वतंत्र लघुकथा उत्कृष्ट आहे. 'शरद ऋतूंतील संध्याकाळ' व 'खरेदि' या भाषांतरित लघुकथाहि सरस आहेत.

संग्रहास जोडलेली प्रा. क्षीरसागर यांची प्रस्तावना मार्मिक आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय

लेखनाची तारीख १ जुलै १९४८

डॉ. कोलते यांचें अभिनंदन

विदर्भ-साहित्य-संघाचे विद्यमान अध्यक्ष प्रा. वि. भि. कोल्ते यांच्या 'महानुभाव तत्त्वज्ञान' या प्रबंधाबद्दल नागपूर-विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टरेट्' देण्याचें ठरविलें आहे, याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. महानुभाव-वाङ्मयाचे संशोधक या नात्याने डॉ. कोलते यांनी महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. अर्थात् त्यांचा नागपूर--विद्यापीठाने गौरव करावा, ही गोष्ट समुचित अशीच झाली.

संयुक्त महाराष्ट्र येणार !

घटना--समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या आदेशाप्रमाणे महाराष्ट्र, आंध्र--वगैरे प्रांतांच्या सीमा ठरविण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत आलें आहे. त्यावर आपल्या प्रांतातर्फे न्या. मू. शेवडे यांची नियुक्ती झाली आहे. संयुक्त महाराष्ट्र आता दृष्टीच्या टप्प्यांत आलें आहे, असें म्हणावयास हरकत नाही ! त्या दिवशा-कडे सर्व विचारवंतांचे डोळे लागलेले आहेत !

समाज शिक्षणाची योजना

वऱ्हाड-मध्यप्रांताच्या मंत्रि मंडळाने समाज शिक्षणाची एक महान् योजना तयार करून ती धडाडीने अमलांतहि आणली आहे. या योजनेप्रमाणे पांच वर्षात हा प्रांत साक्षर झाला पाहिजे व होईल, अशी उमेद आहे.

या योजनेसाठी लहान लहान सुलभ व सुरस पुस्तकें लिहिलीं जावयाचीं आहेत [illegible] तील सर्व लहान-थोर साहित्यिक शिक्षणखात्याशीं सहकार्य करण्[illegible] पुढे सरसावतील, अशी अपेक्षा आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" युगवाणी " (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A अन्वयें 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

'रीटा'मुळे आकर्षक केस–उगवतात

केससमृद्धीसाठीं 'रीटा' हें एक नवीन साधन आहे. केसाच्या मुळांतील नैसर्गिक स्त्रवणास त्याने पोषण होतें. खवड्यास व टक्कलास अटकाव होऊन अनुपम सौंदर्याचे लांब सुंदर केस उगवतात. त्याने खराब केसांना सुंदर चकाकी मिळते आणि वाकड्या केसासाठी तें उत्तम आहे. 'रीटा'ची एक बाटली घेऊन तुमच्या केसांना अनुपम सौंदर्य द्या.

एका बाटलीची किं. १५आणे.

× प्रत्येक ठिकाणीं मिळतें. ×

RITA

HAIR TONIC

उत्तर हिंदुस्थानी सिनेतारका तुम्हांला काय सांगतात ?

ललिता पवारः–ज्यांना उत्तमपैकी केशवर्धक हवें असेल, त्यांना मीं "रीटा" वापरून पहाण्याची शिफारस करतें. आणि, मला खात्री आहे कीं, यावरून आपली मातृभूमि किती उत्तमोत्तम वस्तू तयार करूं शकते हें त्यांना कळून येईल.

शारदा जुन्नरकरः–मी माझ्या केसासाठी "रीटा" वापरण्यास सुरवात केली यायोगें माझे केस जाण्याचें जादूप्रमाणें थांबलें. 'रिट्यां' त केस नरम करणारीं व त्यांना रेशमाप्रमाणें तकाकी आणणारीं अनेक द्रव्यें असून मीं खात्रीपूर्वक म्हणूं शकतें कीं, "रीटा" हें एक अद्भुत केशवर्धक आहे.

के. ईश्वरलालः–मी एकदां "रीटा" वापरलें व त्यानंतर माझ्या कुटुंबांतील सर्वच मंडळींना "रीटा" वापरण्याची संवयच लागली. माझ्या मित्रांना केशवर्धकांमध्यें "रीटा" हेंच पसंत पडेल ही खात्री आहे.

व्हेटो कंपनी, जोन्स स्ट्रीट, मद्रास.

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९। ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ